# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ / कार्तिक २८, १९४० ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

### राज्यातील वीज चोरी रोखण्याबाबत

**(१) * १२८१०८ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २०१३ ते माहे जुलै, २०१८ पर्यंत ५८,९३३ वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आल्याची माहिती ‘माहितीच्या अधिकाराद्वारे’ मिळालेल्या माहितीतून दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिळालेल्या माहितीनुसार वीज चोरीच्या प्रकरणातील ६१५८ वीज चोरीचे प्रकार खब-यांनी दिलेल्या माहितीद्वारे मिळालेले असून यासाठी महावितरणतर्फे माहिती देणाऱ्या लोकांसाठी ४१ लाख ६० हजार ६११ रुपये बक्षीस स्वरुपात देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महावितरण कंपनीला वीज चोरी व वीज गळतीमुळे सुमारे ३ हजार कोटींचे आर्थिक नुकसान झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून वीज चोरी प्रकरणी पकडण्यात आलेल्या वीज चोरांवर कारवाई करण्याबाबत व वीज गळती रोखून महसूल वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सन २०१३ ते २०१८ (जुलै, २०१८) या कालावधीतील ६२३८ वीज चोरी प्रकरणी, महावितरण कंपनीमार्फत रु.६४,६०,६११/- एवढी रक्कम बक्षीस स्वरुपात संबंधितांस देण्यात आले आहेत.
(३) वीज चोरी रोखण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत खालील प्रकारच्या ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१) राज्यात एकूण कायम स्वरुपी ४३ फिरते पथक आपआपल्या कार्यक्षेत्रात नियमितपणे विद्युत संचाची तपासणी करुन विद्युत संचातील अनियमितता व वीजचोरीचे प्रकार शोधून काढण्यासाठी कार्यरत आहेत.

२) विभागीय पातळीवर एकूण १२० विशेष पथके स्थापन करण्यात आलेली आहेत.

३) प्रविभागीय/विभागीय/उपविभागीय पातळीवर एनर्जी ऑडीट करण्यात येते. निर्धारित नॉर्मल लॉसेसपेक्षा जास्त लॉस असल्याचे आढळून आल्यास संबंधित विभागातील ग्राहकांची कसून तपासणी करण्यात येते.

४) ग्राहकांच्या मीटर बॉक्स व मिटर टर्मिनलला सुरक्षा मोहर लावले जातात.

५) वितरण प्रणाली सुधारणेसाठी नवीन उपकेंद्रे उभारणी, उपकेंद्राची क्षमतावाढ करणे, नवीन उच्चदाब वाहिन्या/लघुदाब वाहिन्या, तसेच नवीन रोहित्र उभारणी करणे ही कामे नियमित करण्यात येत असल्याने वितरण प्रणाली सुधारणेमुळे तांत्रिक हानी कमी होण्यास मदत होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मराठा समाजासाठी स्थापन केलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवविकास (सारथी) या संस्थेबाबत

**(२) * १३२०६० श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) धर्तीवर मराठा समाजासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवविकास संस्थेची (सारथी) शासनाने स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, प्रत्यक्ष मुलाखतीचे प्रशिक्षण, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन या माध्यमातून मुख्यत: मराठा समाजातील तरुणांना पाठबळ देण्यासाठी संस्थेची स्थापना केली असून या संस्थेच्या स्थापनेनंतर आतापर्यंत या संस्थेने मराठा समाजातील किती तरुणांना मार्गदर्शन केलेले आहे,

(३) असल्यास, ज्या उद्देशासाठी ही संस्था स्थापन केली आहे तो उद्देश पूर्ण झाला नसल्याच्या तक्रारी राज्यातील तरुणांनी केल्या असून ज्या उद्देशासाठी ही संस्था स्थापन झाली होती तो उद्देश पूर्ण होण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी लक्ष घालावे अशी विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) दि.२६ जून, २०१८ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून, महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कार्यालयाचे पुणे येथे उद्घाटन करण्यात आले आहे. सारथी मार्गदर्शन समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सदर आशयाचे निवेदन अद्याप अप्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांकरिता शासनाने निर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टाएवढे पीक कर्ज वाटप न झाल्याबाबत

**(३) * १२६५३६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा व विदर्भातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्याचे आदेश राज्य शासनाने सहकारी बँकाना दिल्यानंतरही फक्त ३० टक्केच पीक कर्ज वितरीत झाले असून, सुमारे २० लाख शेतकऱ्यांना कर्ज वाटप झाले नसल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ मध्ये मराठवाड्यातील जिल्हा मध्यवर्ती बँकाना ११ हजार ९२७ कोटी ८४ लाख रुपयांचे पीक कर्ज वाटप उद्दिष्ट देऊनही केवळ ३५ टक्यांचे कर्ज वाटप सहकारी बँकांकडून झाले असून, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीक कर्जासाठी शेतकऱ्यांची अडवणूक सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पीक कर्ज बाकी नसल्याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय राष्ट्रीय बँकांनी कर्ज देऊ नये असे आदेश काढल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यस्तरीय बँकांच्या बैठकीत राज्यात सुमारे ६३ हजार कोटीचे कर्ज वितरीत करण्याचे लक्ष्य राज्यातील राष्ट्रीयकृत बँकापुढे

ठेवले होते मात्र माहे सप्टेंबर, २०१८ अखेर केवळ २१,६८६ कोटीचेच कर्जवाटप झाले असून उद्दिष्टाच्या फक्त ४९ टक्के पीक कर्जाचे वाटप झाले असून तसेच अकोला जिल्हयात यावर्षी १३३४ कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असतांना फक्त ४१६ कोटी रुपयाचे कर्ज वाटप झाले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी वारंवार निर्देश देऊनही राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँकांची पीक कर्ज वाटपात उदासिनता दिसून येत असून शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा शासनाने निर्दिष्ट केलेल्या उद्दीष्टाप्रमाणे होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) व (३) मराठवाडा विभागातील बँकांनी सन २०१८-१९ च्या खरीप हंगामामध्ये ८,११,०७२ शेतकऱ्यांना रु.४,७०४.७९ कोटीचे (३९%) पीक कर्जवाटप केलेले आहे. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि.२५.०५.२०१८ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रमाणपत्र असल्याशिवाय कर्जवाटप करु नये असे जिल्हा अग्रणी बँकेस कळविले आहे.

(४) अंशत: खरे आहे. राज्यातील बँकांना सन २०१८-१९ चे खरीप हंगामासाठी रु.४३,८७३.८० कोटी व रब्बी हंगामासाठी रु.१४,४५०.६८ कोटी असा एकूण रु.५८,३२४.४८ कोटीचा लक्षांक देण्यात आलेला आहे. त्यापैकी राष्ट्रीयकृत बँकांना खरीप हंगामासाठी रु.२४,२५३.०९ कोटीचा लक्षांक देण्यात आलेला आहे. राज्यातील बँकांनी खरीप हंगामामध्ये दि.३०.०९.२०१८ अखेर ३०.४२ लाख शेतक-यांना रु.२२,९४६.४५ कोटीचे (५२%) पीककर्ज वाटप केलेले आहे. त्यापैकी राष्ट्रीयकृत बँकांनी ८.७४ लाख शेतक-यांना रु.१०,५२९.५३ कोटीचे (४३%) पीककर्ज वाटप केलेले आहे. अकोला जिल्हयासाठी खरीप हंगामासाठी रु.१,३३४.८६ कोटीचा लक्षांक दिला असुन जिल्हयातील सर्व बँकांनी दि.३०.९.२०१८ अखेर रु.४१६.५७ कोटी (३१%) पीककर्ज वाटप केलेले आहे.

(५) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील खरीप आढावा बैठक २०१८ मधील बैठकीमध्ये सर्व बँकांना पीककर्ज वाटपाच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हास्तरावर कृती कार्यक्रम तयार करुन पीककर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पीककर्ज मेळाव्यास स्थानिक दै.वर्तमानपत्रामध्ये व्यापक प्रसिध्दी देण्यात आली. मेळाव्यामध्ये पात्र शेतक-यांचे कर्ज मागणी अर्ज भरुन घेणे, कागदपत्रांची पुर्तता करणे इ. कामकाज करण्यात आले. गावामध्ये जनजागृती होण्यासाठी संबंधित तलाठी/मंडल अधिकारी यांचेमार्फत दवंडी देण्यात आली. सर्व बँकांतर्फे बॅनर्स, माहिती पत्रके याद्वारे पीककर्ज वाटपाची माहिती देण्यात आली.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * १२८९६३ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ३३ आश्रमशाळांमध्ये सुमारे ९४ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे कधीपासून रिक्त आहेत व रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण देण्यासाठी रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) २३ आश्रमशाळांमध्ये सुमारे ६९ शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत.

(२) सदर जागा भरण्यासाठी वृत्तपत्रात जहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते.तथापि, बिगर आदिवासी हक्क बचाव

समिती शहापूर, जि.ठाणे यांनी या भरती प्रक्रियेविरूध्द मा.उच्च न्यायालय येथे रिट याचिका दाखल केली असुन मा.उच्च न्यायालयाचे आदेश दि.१५ मे, २०१५ नुसार भरती प्रक्रियेस उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश होईपर्यंत अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे.

(३) आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून दि.३०/४/२०१६ पुर्वी कार्यरत तासिका कर्मचा-यांची तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदांवर तसेच उच्च माध्यमिक व माध्यमिक शिक्षक गणित, विज्ञान व इंग्रजी विषयाच्या रिक्त जागेवर अथवा दीर्घ रजेवर गेलेल्या कर्मचा-यांच्या जागी तासिका पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गणित, विज्ञान व इंग्रजी विषयाचा दर्जा उंचावण्यासाठी क्रॅश कोर्सचे नियोजन करण्यात आले आहे. २३ शाळांमध्ये कंत्राटी पध्दतीने क्रीडा शिक्षकाची पदे भरली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डिंभे धरणाचे (ता.आंबेगाव, जि.पुणे) वीजदेयक थकल्याने वीजपुरवठा खंडित केल्यामुळे धरणाच्या सुरक्षिततेला निर्माण झालेला धोका

**(५) * १२९७९३ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पातील हुतात्मा बाबू गेनू जलाशय (डिंभे धरण) (ता.आंबेगाव, जि.पुणे) या धरणाचे विजेचे देयक थकल्याने महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा खंडीत केल्याचे माहे जुलै, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या थकीत वीज देयकाची रक्कम किती आहे तसेच या ठिकाणी वीज नसल्याने धरणाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील भीमाशंकर, पाटण व आहुपे खोऱ्यामध्ये वीज पुरवठा सतत खंडित होत असल्याने या परिसरातील व्यवसायावर व जनजीवनावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल घेतली जात नसून या भागात श्वापदांचा वावर असल्याने त्यातच वीज नसल्याने येथील आदिवासी जनतेच्या जिविताला देखील धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या परिसरातील विद्युत पुरवठयात सुधारणा करण्यासाठी डिंभे येथे ३३/११ के.व्ही क्षमतेचे उपकेंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(६) असल्यास, शासनाने उपरोक्त मुद्द्यांबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व शासनाने उक्त ठिकाणी नियमित वीजपुरवठा व्हावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) सदर धरणाच्या थकीत वीज देयकाची रक्कम दिनांक १५.०९.२०१८ रोजी रुपये १.०३ कोटी इतकी आहे.

(३) सदर खोऱ्यामध्ये ३३/११ के.व्ही. तळेघर या उपकेंद्रामधून वीज पुरवठा होत आहे. तसेच हा भाग अतिशय दुर्गम असून तेथील वीज वाहिनीची लांबी खूप जास्त आहे. वादळ वारे व पावसात वीज पुरवठा खंडीत झाल्यास तो तातडीने पूर्ववत करण्यात येतो.

(४) हे खरे नाही.

सदर खोऱ्यामध्ये विद्युत पुरवठयात सुधारणा करण्याकरिता डिंभे येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) डिंभे येथे ३३/११ के.व्ही. क्षमतेचे उपकेंद्र स्थापन करण्याकरिता लागणारा निधी रुपये ३.८१ कोटीची मागणी आदिवासी उपयोजने अंतर्गत (TSP), विभागीय आयुक्त, आदिवासी विभाग यांचेकडे करण्यात आली असून अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

(६) आबेगांव तालुक्यातील वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी देखभाल व दुरुस्ती (आर ॲण्ड एम योजना) अंतर्गत ४ कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात आलेल्या असून, कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर कंत्राटामध्ये वितरण पेटी बदलणे, जुने मोडकळीस आलेले पोल बदलणे, विद्युत तारा बदलणे इ. कामे अंतर्भूत असून प्रगतीपथावर आहेत.

-----------------

## राज्यातील पाच जिल्हा सहकारी बँकेचे कर्ज थकविलेल्या साखर कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६) * १२७००९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच जिल्हा सहकारी बँकांचे सुमारे १२२३.९३ कोटी रुपयांचे कर्ज थकविले असल्याकारणाने ११ मोठ्या साखर कारखान्यांना नोटीसा बजावल्या असल्याचे माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साखर कारखान्यांना सरकारी हमीवर कर्ज वितरण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कर्ज थकविणाऱ्या या साखर कारखानदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच कर्जाची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. सोलापूर, वर्धा, नाशिक, बुलडाणा व उस्मानाबाद या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी एकूण १० साखर कारखान्यांना कर्ज वितरीत केले असून त्यापैकी ५ कारखान्यांना शासन थकहमी देण्यात आलेली आहे.

अ) थकहमी असलेले साखर कारखाने खालील प्रमाणे आहेत.

i) सांगोला सहकारी साखर कारखाना-थकीत रक्कम रु.८२.८६ कोटी

ii) सहकार महर्षी स्व.बा.देशमुख सह. साखर कारखाना मर्या. वेळा व सुतगिरणी-थकीत रक्कम रु.६८.३४ कोटी

iii) तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना, ढोकी-थकीत रक्कम रु.११४.६४ कोटी.

iv) तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखाना, नळदुर्ग-थकीत रक्कम रु.२१.९८ कोटी

v) नरसिंह सहकारी साखर कारखाना, इंदापूर-थकीत रक्कम रु.२.९५ कोटी.

ब) थकहमी नसलेले साखर कारखाने खालील प्रमाणे आहेत.

i) आयर्न शुगर प्रा.लि.-थकीत रक्कम रु.२१४.३२ कोटी.

ii) शंकरराव मोहिते सहकारी साखर कारखाना-थकीत रक्कम रु.५६.०३ कोटी.

iii) निफाड सहकारी साखर कारखाना-थकीत रक्कम रु.१४७.४८ कोटी.

iv) नाशिक सहकारी साखर कारखाना-थकीत रक्कम रु.१३६.९२ कोटी.

v) अनुराधा शुगर मिल्स-थकीत रक्कम रु.१८.८४ कोटी.

(३) व (४) वरील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी थकीत रक्कम वसूल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदी तसेच सेक्युरायटेझशन ॲक्ट २००२ अंतर्गत संबंधित साखर कारखान्यांवर कार्यवाही सुरू केली आहे.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्हयातील चिपी विमानतळाच्या प्रकल्पासाठी भुसंपादन केलेल्या जमिन धारकाच्या प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीस नोकरी देण्याबाबत

**(७) * १२६५५५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत**

**भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील चिपी विमानतळाची कामे त्वरीत पूर्ण करण्याचे आदेश मा.उद्योग मंत्री महोदयांनी दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या प्रत्येक जमिन धारकाच्या कुटूंबातील एका व्यक्तीस नोकरी उपलब्ध करुन देणे व चिपी गावातील इतर व्यक्तिंना पात्रतेप्रमाणे नोकरीमध्ये सामावून घेण्याची मागणी सदरील प्रकल्पग्रस्तांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिपी विमानतळासाठी भुसंपादित प्रत्येक कुटूंबातील व्यक्तीस नोकरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार भूसंपादन केलेल्या कुटुंबातील व्यक्तीस औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यामध्ये नोकरीत सामावून घेण्याकरीता प्राधान्य देण्याबाबत पत्र देण्यात येते, तसेच स्थानिकांना कंपन्यांच्या आस्थापनामध्ये ८० टक्के नोकरीत सामावून घेणेबाबत दि.१७/११/२००८ चे शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत येते.

-----------------

## नेवासा तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्यात महावितरण कंपनीने करावयाची आवश्यक दुरुस्तीची कामे वेळेवर न केल्याबाबत

**(८) * १३२१२३ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्यात महावितरण कंपनीने करावयाची आवश्यक दुरुस्तीची कामे वेळेवर न केल्यामुळे नेवासा तालुक्यातील मौजे चिंचोली येथील श्रीमती सरिता ठोंबरे या ३२ वर्षीय

महिलेला शेतात तुटलेल्या तारेचा स्पर्श झाल्याने सदरहू महिला मृत्युमुखी पडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात वीजेचे खांब झुकलेले आहेत, खांबालगतची झाडे व वेली वाढलेल्या असून शाळेच्या आवारातून जाणा-या वीज वाहिन्या व खांबाचे अडथळे आदींमुळे यापूर्वीही अनेकदा दुर्घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कारवाई करण्याबाबत, तसेच नेवासा तालुक्यातील उक्त समस्या दूर करण्याबाबत व मृत व्यक्तीच्या कुंटूबियास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नेवासा तालुक्यातील मौजे नाशिक चिंचोली येथील श्रीमती सरिता ठोंबरे या ३९ वर्षीय महिलेला दिनांक १२.०७.२०१८ रोजी वादळी वाऱ्यात तुटलेल्या वीजेच्या तारेचा संपर्क झाल्याने त्या मृत्यूमुखी पडल्या आहेत.

(२) सदर परिसरात यापूर्वी दुर्घटना घडल्याचे आढळून आलेले नाही.

(३) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, अहमदनगर यांनी केली असून मयत व्यक्तीच्या कुटुंबियास महावितरण कंपनीच्या नियमानुसार आर्थिक मदत देण्याबाबतची कार्यवाही चालू असून मयताचे कुटुंबाकडून वारसदाराचे प्रमाणपत्र व मृत्यूचा दाखला प्राप्त झाल्यानंतर आर्थिक मदत देण्यासंबंधीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काष्टी (ता.जि.अहमदनगर) येथील स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत झालेला गैरव्यवहार

**(९) * १३२६२३ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काष्टी (ता.जि.अहमदनगर) येथील स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.
(२) व (३) सदर पतसंस्थेच्या कर्जदारांनी कर्जवसूली मधील गैरव्यवहार व इतर मुद्द्यांबाबत केलेल्या तक्रारींमध्ये तथ्य आढळून आल्याने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीगोंदा यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ नुसार दिनांक २७.७.२०१८ रोजीच्या आदेशान्वये संबंधीत कर्जदाराची जादा वसूल केलेली रक्कम त्या कर्जदारास परत करण्याचे व संबंधीत कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश पतसंस्थेस दिले. त्यानुसार संस्थेने कर्जदारास रु. १,१६,५०७ /- (व्याजासह) रक्कम परत केली असून कॅशिअर श्री. उगार यांचेवर पोलीस स्टेशन, श्रीगोंदा येथे एफ आय आर क्र. ८०१/२०१८, दि. २२.८.२०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदारांच्या तक्रारीमधील इतर मुद्द्यांबाबत चाचणी लेखापरिक्षण करण्याची शिफारस सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीगोंदा यांनी दिनांक ३१.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: सोलापूर व पुणे जिल्हयातील जातप्रमाणपत्र पडताळणीच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असल्याबाबत

**(१०) * १२९७६१ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी),**

**श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सोलापूर व पुणे जिल्हयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा जात प्रमाणपत्र पडताळणीच्या प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत असल्यामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी विभागीय जातप्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात दिनांक २७ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास गोंधळ घातला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०१८-१९ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी जून, २०१८ मध्ये जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज करूनही त्यांना वेळेत जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नसल्याने अनेक महाविद्यालयांनी अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज. व इ.मा.व. या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ तांत्रिक कारणासाठी प्रवेश रद्द केल्याने अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज. व इ.मा.व. च्या विद्यार्थ्यांना सवलतींपासून वंचित राहावे लागले असल्याने त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करून त्यांना पुन्हा त्याच महाविद्यालयात प्रवेश देण्यात यावा, अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण कागदपत्रे घेऊन जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राकरीता वारंवार ये-जा करावे लागत असून, सदर काम या कार्यालयातील मध्यस्थांमार्फत केल्यास तातडीने कामे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांना सुलभतेने त्वरीत जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे तसेच त्वरीत जातपडताळणी प्रमाणपत्र न देणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने प्रवेशावेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य केल्यामुळे महाराष्ट्र शासन व प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी राखीव प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत निर्धारित केली होती.
सदर निर्देशानुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाना पुढील सूचना देण्यात आल्या होत्या :-

१) ज्या विद्यार्थ्यांनी निर्धारित दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, परंतु तांत्रिक कारणास्तव संस्थेमार्फत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केले नाहीत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नयेत.

२) ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित मागासवर्गीय प्रवर्गातून अर्ज सादर केला होता व त्यांना गुणवत्तेने General Open/All India/TFWS/ Defence/Minority seat/PWD seat या जागेवर प्रवेश मिळाला परंतु, निर्धारित अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी सादर केले नाही, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित संस्थेने कटेगरी कन्व्हर्शन फी रक्कम रु.२००/- इतकी आकारून खुल्या प्रवर्गामध्ये बदल करण्यात यावा व तसे संबंधित विद्यार्थ्यास लेखी निदर्शनास आणावे.

३) निर्धारित अंतिम दिनांकानंतरचे संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्यानी प्रवेशासाठी सादर केले असल्यास, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत पूर्वी नमूद केल्याप्रमाणे म्हणजेच आवश्यक प्रमाणपत्र सादर केले नाही म्हणून प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करावी.

(३) सदर आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) हे खरे नाही.

(५) सन २०१८-१९ मध्ये व्यावसायिक व अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या अ.ज., वि.जा.भ.ज. व इ.मा.व. च्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द न होण्यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून वेळोवेळी प्रकरणांचा आढावा घेऊन विशेष मोहीम राबवून वेळेत प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयात शासकीय खरेदी केंद्रे सुरू करण्याबाबत

**(११) * १२९९०८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात शासकीय खरेदी केंद्रे सुरु केली नसल्याने शेतकऱ्यांच्या घरात उडीद व मुग पडून राहिल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय खरेदी केंद्रे सुरु न झाल्यामुळे शेतकऱ्यांना अत्यंत कमी दराने व्यापाऱ्यांना शेतमाल विक्री करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणी शासकीय खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२), (३) व (४) राज्यात मूग व उडीदाची हमीभावाने नाफेड व भारतीय अन्न महामंडळाच्या वतीने खरेदी करण्यासाठी दिनांक २५/९/२०१८ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली आहे. अमरावती जिल्हयात विदर्भ पणन महासंघाची ५ खरेदी केंद्रे आणि

पणन महासंघाची ७ खरेदी केंद्रे अशी एकूण १२ खरेदी केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. सदर खरेदी केंद्रावर दिनांक १०/११/२०१८ पर्यंत झालेली खरेदी पुढील प्रमाणे आहे:-

| जिल्हा | पिक | एकूण खरेदी(क्विं) |
|---|---|---|
| अमरावती | मूग | २१९८.६८ |
| | उडीद | २११०.३२ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुजरातमधील दहेज येथून नागोठाण्यापर्यंत (जि.रायगड) ईथेन वाहून नेणाऱ्या पाईप लाईनकरिता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(१२) * १२६६५३ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुजरातमधील दहेज येथून नागोठाण्यापर्यंत (जि.रायगड) ईथेन वाहून नेणाऱ्या पाईपलाईनसाठी रिलायन्सने वाडा (जि.पालघर) तालुक्यात ठिकठिकाणी शेतकऱ्यांना मोबदला न देताच सुपीक जमिनीवर खोदकाम केल्याने त्यांस विरोध करणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ च्या सुमारास अमानुष मारहाण केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनही दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रिलायन्स गॅस पाइपलाइन कंपनीकडून अल्प दरात शेतजमिनीचा मोबदला देऊन दडपशाहीने जमीन संपादित केल्यामुळे पेण तालुक्यातील (जि.रायगड) कळंद, जिरणे तुरामळ, चाफेगणी, बोरगाव, आमटेम, गागोदे येथील शेकडो शेतकऱ्यांनी उपविभागीय कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ही पाईपलाईन टाकतांना रिलायन्सने शेतकऱ्यांवर अन्याय करत जमिनीचा मोबदला न देताच खोदकाम सुरु केले असून त्यांना मारहाण केली जात आहे तरी याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) त्यानुषंगाने शासनाने संबधितांना जमिनीचा योग्य तो मोबदला देण्याबाबत व शेतकऱ्यांना मारहाण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४), (५) व (६) हे खरे नाही. तथापि, साखळी उपोषण केल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे. त्याअनुषंगाने सदर जमिनींच्या मोबदल्याबाबत शेतकरी यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने पालकमंत्री, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१/१०/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, रायगड, उपविभागीय अधिकारी, पेण सक्षम प्राधिकारी, दहेज नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प, संपादन संस्थेचे प्रतिनिधी व उपोषणकर्ते यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ज्या शेतकऱ्यांना समान दराने नुकसान भरपाई मिळाली नाही अशा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी त्यांचे नुकसान भरपाई पत्र तहसिलदार, पेण व उपविभागीय अधिकारी, पेण यांचे शिफारशीसह सक्षम प्राधिकारी, दहेज नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प यांच्याकडे सादर

करावे. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी शिफारस करून रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. यांनी सदर वाढीव मोबदला संबंधितांना द्यावा अशा सूचना दिल्या आहेत.

-----------------

## राज्यातील ३६ पैकी १८ जिल्ह्यात जात पडताळणी समित्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१३) * १२६४८० श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल**

**सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जातींच्या दाखल्यांची पडताळणी करणाऱ्या ३६ पैकी सुमारे १८ जिल्हास्तरीय समित्यांचे अध्यक्षपद मागील दोन वर्षापासून रिक्त असल्यामुळे जात पडताळणीची सुमारे ३५ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात समित्यांची अध्यक्ष पदे रिक्त असल्याने जातीच्या दाखल्यांची प्रक्रिया प्रलंबित असुन विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यास, नोकरदार वर्गास पदोन्नती व नियुक्ती मिळण्यास तसेच लोकप्रतिनिंधीनाही निवडणूक लढविण्यास अडचणी निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र मिळण्याकरीता स्वतःच्या वडिलांचे, काकाचे, चुलतभावाचे तसेच नात्यातील इतर सदस्यांचे जात वैधता प्रमाणपत्र जोडलेले असतांनाही मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जात पडताळणी समितीकडून प्रमाणपत्रे देताना शपथपत्रासाठी स्टॅम्पपेपर वापरु नयेत, त्याऐवजी अर्जदाराने साध्या कोऱ्या कागदावर लिहिलेला अर्ज (मजकूर) शपथपत्रासाठी ग्राहय धरला जाईल असे निर्देश दिले असतानाही, राज्यातील जात पडताळणी समित्या शपथ पत्रासाठी स्टॅम्प

पेपरचा आग्रह धरत असल्याने मागासवर्गीयांची कुचंबणा होत असून त्यांना आर्थिक भुर्दंड पडत असून जात प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१६ साली औरंगाबाद खंडपीठात दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणीनंतर रिक्त असलेली १९० पदे तात्काळ भरावीत असे आदेशही देण्यात आलेले असताना आजमितीस त्यांची शासनाकडून अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने राज्यातील रिक्त असलेली सर्व पदे तात्काळ भरून जात पडताळणी समितीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सर्व ३६ समित्यांकडे मिळून ऑगस्ट, २०१८ अखेर ३५००० हजार प्रकरणे दोन वर्षापासून प्रलंबित नसून, एकूण सर्व समित्यांकडे २२४१२ प्रकरणे कार्यवाहीतील (तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधी) आहेत. तर, ११९८१ प्रकरणे प्रलंबित (तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी) असून त्यापैकी फक्त ३४६१ प्रकरणे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता प्रलंबित आहेत.

तसेच राज्यातील ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी १६ समित्यांच्या अध्यक्ष पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून समित्यांचे कामकाज सुरळीत सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

(५) व (६) राज्यातील ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी १६ समित्यांच्या अध्यक्ष पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत.

सदस्य सचिवांच्या ३३ पदांवर नियमित अधिकारी कार्यरत असून ३ पदे रिक्त आहेत.

सदस्यांची २८ पदे भरली असून ९ पदे रिक्त आहेत. तर गट क संवर्गातील पदावर समाज कल्याण आयुक्तालयाने नियमित कर्मचारी उपलब्ध करुन दिले असून, बार्टी या संस्थेमार्फत समित्यांना बाह्यस्त्रोताद्वारे अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

अध्यक्षांच्या रिक्त पदावर पदोन्नतीने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही महसूल व वन विभागामार्फत करण्यात येत असून, अध्यक्षांची उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत अध्यक्षांच्या पदांच्या समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आलेली आहे. त्याद्वारे अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर सदर पदांवर प्राधान्याने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

सदस्य सचिवांची तथा सहायक आयुक्त समाजकल्याण संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले असून त्यांच्याकडून उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर सदस्य सचिवांच्या पदावर प्राधान्याने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

सद्यस्थितीत अध्यक्षाच्या रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून समित्यांचे कामकाज सुरळीत सुरू आहे.

-----------------

## कोकणातील नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील प्रस्तावित ग्रीन रिफायनरी प्रकल्पाबाबत

**(१४) * १२६४६५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रिफायनरी प्रकल्प व इतर विनाशकारी प्रकल्पांच्या विरोधात प्रकल्पग्रस्तांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास साखरनाटे-माडबन मार्गे मोर्चा काढून जेलभरो आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाणार येथील तेलशुध्दीकरण प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून आतापर्यंत किती जमिन संपादीत करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या तेल शुध्दीकरण प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्यांचे पुनर्वसन तसेच भूसंपादन यासाठी राज्य शासन आणि रत्नागिरी रिफायनरी ॲण्ड पेट्रोकेमिकल कंपनीला शिफारशी करण्याकरीता, राज्य शासनातर्फे निवृत्त मुख्य सचिव श्री.द.म. सुखथनकर यांचे अध्यक्षतेखाली तज्ञांची उच्चस्तरीय समिती दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू समितीवर कोणत्या तज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे व याबाबतचा अहवाल किती कालावधीत शासनास सादर करण्यात येणार आहे,

(५) तसेच उक्त प्रश्नी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

सदरचा मोर्चा जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पासाठी होता.

(२) नाणार येथील तेल शुध्दीकरण प्रकल्पासाठी अद्याप अंतिमत: जमीन संपादन करण्यात आलेली नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

श्री. डी.एम. सुकथनकर, निवृत्त मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीवर खालील सदस्यांचा समावेश आहे.

(i) डॉ. विजय केळकर

(ii) प्रो. अभय पेठे

(iii) प्रो. जे. बी. जोशी

(iv) प्रो. अरविंद सावंत

सदर समितीचा अहवाल  पुर्ण करण्याचा कालावधी ८ महिन्याचा आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (पूर्व) (मुंबई) येथील महात्मा ज्योतिबा फुले मुलांच्या वसतीगृहातील समस्यांचे निवारण करण्याबाबत

**(१५) * १२९४७८   श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) (मुंबई) येथील १४० क्षमता असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले मुलांच्या वसतीगृहातील भोजनगृहातील अस्वच्छता, स्वच्छतागृहातील छत गळके, तसेच अपुर्ण असलेली विदयुत जोडणी इत्यादी अनेक समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वसतिगृहात १४० अंध व अपंग विद्यार्थी वास्तव्यास असून या वसतिगृहासाठी मंजूर असलेल्या विविध संवर्गापैकी २ लिपिकांचे व १ गृहपालाचे पद कित्येक महिन्यांपासून रिक्त असून केवळ १ शिपाई कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मागील ३ वर्षापासून सातत्याने पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदर वसतीगृहातील दुरवस्थेस कारणीभूत असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच रिक्त असलेली पदे भरुन वसतीगृहातील समस्यांचे निवारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२), (३) व (४) या वसतीगृहात १० अपंग व अंध प्रवर्गातील विदयार्थी प्रवेशित आहेत.

या वसतीगृहाच्या गृहप्रमुख व गृहपाल या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आलेला असून, लिपिक व शिपाई ही पदे रिक्त आहेत. तर पहारेकरी व सफाईगार या पदावर कर्मचारी कार्यरत आहेत.

शासकीय कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास सध्या निर्बंध असल्याने वसतीगृहासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यास अडचणी येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सलसाडी (ता.तळोदा, जि.नंदुरबार) गावातील शासकीय आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा विजेचा धक्का लागून झालेला मृत्यु

**(१६) * १२७७३८ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस**

**(माळशिरस), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सलसाडी (ता.तळोदा, जि.नंदुरबार) गावातील शासकीय आश्रमशाळेत शिकणाऱ्या कु.सचिन चंद्रसिंह मोरे या १२ वर्षीय विद्यार्थ्याचा दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी उघड्या व असंरक्षित डीपीचा धक्का लागून मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेमुळे संतप्त झालेल्या जमावाने सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी व तहसिलदार यांचे समोर घटनास्थळी ठिय्या आंदोलन करत निषेध व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, आश्रमशाळेच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सदर अपघात झाला असल्याने संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत व मृताच्या कुटूंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळा, सलसाडी, ता.तळोदा, जि.नंदूरबार येथे इ.६ वी मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी कु.सचिन चंद्रसिंग मोरे, यांचा दि.२७/८/२०१८ रोजी शाळेच्या आवारातील बोरवेलच्या स्वीच बोर्डाचे बटण सुरू करण्याचा प्रयत्न केला असता विद्युत करंट लागून मृत्यु झाला आहे.

सदर घटनेनंतर आश्रमशाळेच्या आवारात जनसमूदाय जमून प्रकल्प अधिकारी आल्या शिवाय मृत विद्यार्थ्यांचे प्रेत उचलणार नाहीत अशी भूमिका घेतली होती. याबाबत प्रकल्प अधिकारी यांना कळविले असता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तथा सहायक जिल्हाधिकारी, तळोदा यांच्यासह तहसिलदार तळोदा, उप विभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकुवा यांनी तातडीने घटना स्थळास भेट दिली व उपस्थित जमावाशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. परंतु उपस्थित जमावास काही असामाजिक तत्वांनी भडकवल्याने सदर जमावाने हिंसक होवून कोणत्याही

प्रकारची चर्चा न करता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तथा सहायक जिल्हाधिकारी, तळोदा व तहसिलदार, तळोदा यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. सदर हल्यानंतर दोन्हीही अधिकाऱ्यांना वैद्यकीय उपचारार्थ, जिल्हा रूग्णालय, नंदूरबार येथे दाखल करण्यात आले.

सदर घटनेची प्रकल्प अधिकारी, तळोदा यांच्या स्तरावर त्रिस्तरीय समिती गठीत करून चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत शासकीय आश्रमशाळा, सलसाडी येथील नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने येथे वीज जोडणी नव्हती. माहे जून, २०१८ मध्ये शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांसाठी पाण्याचा प्रश्न उद्भवल्याने पाणी साठवण्यासाठी नवीन इमारतील एक नवीन ओवर हेड पाण्याची टाकी उपलब्ध होती. नवीन आश्रमशाळा इमारतीत विद्युत जोडणी करण्यात आलेली नव्हती. कारण सदर विद्युत जोडणीबाबतचा प्रस्ताव विद्युत जोडणी कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव सुमारे ५ महिने सदर कार्यालयाकडे प्रलंबित होता. त्यामुळे नाईलाजाने तातडीची बाब म्हणून प्रभारी मुख्याध्यापक व अधीक्षक यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तसेच ओवर हेड पाण्याची टाकी भरून पाण्याचा नियमित पुरवठा होण्यासाठी संबंधित बांधकाम ठेकेदारांशी बोलणी करून त्यांचे स्तरावर विनापरवानगी थ्रीपेज विद्युत जोडणी करून घेतली होती असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आश्रमशाळेचे प्रभारी मुख्याध्यापक व अधीक्षक यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करून निलंबीत करण्यात आले आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून प्रधान सचिव (आ.वि.वि.) व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी स्वत: सदर आश्रमशाळेस भेट देवून मृत विद्यार्थ्याच्या पालकांबरोबर तसेच गावकऱ्यांबरोबर संवाद साधून त्यांचे सांत्वन केले आहे. तसेच आश्रमशाळा परिसराची पाहणी करून सोयी सुविधांचा आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक त्या सूचना केल्या आहेत. त्यानूसार सदर आश्रमशाळा सर्व सोयी सुविंधा युक्त अशा नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आली आहे. तसेच यासारख्या घटना भविष्यात घडू नये म्हणून शासनाने दि.१ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सर्व शासकीय आश्रमशाळांचे Risk Assessment करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच मयत विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे रुपये २,००,०००/- (रु.दोन लक्ष फक्त) इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे शिवापूर व बोढरे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील नवीन अविभाज्य शर्थीच्या जमिनीच्या व्यवहारात सोलार कंपन्यांकडून झालेला गैरव्यवहार

**(१७) * १२७४०५ श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवापूर व बोढरे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील नवीन अविभाज्य शर्थीच्या जमिनीच्या व्यवहारात मे.गो रेन्यूएबल एनर्जी प्रा.लि.ठाणे, जे.बी.एम सोलर पॉवर महाराष्ट्र प्रा.लि. आणि फर्मी सोलर फार्म्स प्रा.लि. या कंपन्यांकडून गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सोलर कंपन्यांनी केलेल्या बेकायदेशीर कारभाराची विनाविलंब चौकशी करण्याबाबत अचलपूर येथील विधानसभा सदस्यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी लेखी निवेदन देवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने दोषी असलेल्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ते (४) दिनांक १/८/२०१८ चे निवेदन या विभागाच्या अभिलेख्यात आढळून आले नाही. तथापि, मौजे शिवापूर व बोढरे, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव येथील नवीन अविभाज्य शर्तीच्या जमिनीचे सौर ऊर्जा प्रकल्पासाठी बेकायदेशीररित्या खरेदी करण्यात आलेल्या

जमिनी संदर्भात मा.राज्यमंत्री (महसूल) यांना प्राप्त झालेल्या दिनांक ३१/७/२०१८ रोजीच्या पिडीत शेतकऱ्यांनी दिलेल्या व मे. गो रेन्युएबल एनर्जी प्रा.लि. ठाणे व मे.जे.बी.एम सोलर पॉवर महाराष्ट्र प्रा.लि. या कंपन्यांचा उल्लेख असणाऱ्या निवेदनाच्या अनुषंगाने, उपविभागीय अधिकारी, जळगाव यांनी सुनावणीचे आयोजन करून, संबंधीतांचे म्हणणे प्राप्त करून, विविध मुद्दांबाबत, सर्व कागदपत्रांसह जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यामार्फत अहवाल सादर करावयाच्या सूचना महसूल व वन विभागाव्दारे देण्यात आल्या आहेत.

-----------------

**गुंज (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा कुपोषणामुळे झालेला मृत्यु**

**(१८) * १२७७०५ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.किसन कथोरे**

**(मुरबाड), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंज (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी आश्रमशाळेतील कु.प्रमिला शांताराम पागी या इ. ८ वी मधील १४ वर्षीय मुलीचा कुपोषणामुळे दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कु.प्रमिलाचा मृत्यू हा भूकबळी असून पौष्टिक अन्न न मिळाल्याने रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होऊन तिचा मृत्यू झाल्याने याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक आणि माजी विधानसभा सदस्य विवेक पंडित यांनी म.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री तसेच जिल्हाधिकारी, पालघर आदींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मृत विद्यार्थीनीच्या पोटात गाठ असल्याचे शवविच्छेदन अहवालात आढळून आले असून आश्रमशाळांमध्ये नियमित तपासणी होते असे सांगितले जाते तथापि गेल्या सहा महिन्यांपासून ही विद्यार्थीनी आजारी असल्याचे आढळून आले असून या वैद्यकिय तपासणीबाबत साशंकता असल्याबाबतची तक्रार संबधितांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने आश्रमशाळा प्रशासनावर कारवाई करण्याबाबत तसेच मुलीच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार अंतर्गत शासकीय आश्रमशाळा, गुंज-बुधावली, ता.वाडा, जि.पालघर येथे इ.८ वी मध्ये शिक्षण घेणारी विद्यार्थीनी कुमारी प्रमिला शांताराम पागी, हिला दि.१/९/२०१८ रोजी सकाळी अस्वस्थ वाटत असल्याने ग्रामीण रूग्णालय वाडा यांचे संदर्भाने जिल्हा रूग्णालय, ठाणे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेथे सदर मुलींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

सदर विद्यार्थीनी ही मु.पो. नांदीठणे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील रहिवाशी असून तिने दि.२६/६/२०१८ रोजी म्हणेज मृत्युच्या घटनेपूर्वी सुमारे दोन महिन्यापूर्वीच शासकीय आश्रमशाळा गुंज येथे इ. ८ वी मध्ये प्रवेश घेतला होता. तसेच मुलगी आश्रमशाळेत दाखल झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी दि.२७/६/२०१८ रोजी आरबीएसके टिमने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली होती. सदर तपासणी दरम्यान सदर विद्यार्थीनीस कोणताही आजार आढळला नाही. तसेच सदर विद्यार्थीनीस अस्वस्थ वाटत असल्याने तात्काळ वैद्यकीय उपचारासाठी दाखल केल्याचे दिसून येत असून कर्मचाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाल्याचे दिसून येत नाही.

सदर मृत्युंच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन समितीने चौकशी केली असुन उपचार पत्रिकेतील नोंदीनुसार सदर मुलीचा मृत्यु तीव्र रक्तक्षय व हार्ट फेल्युअर मुळे झाल्याचे व मेंदुज्वर असल्याचे आढळून येत आहे असे नमुद असुन शवविच्छेदन अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

नमुद आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांना नियमानुसार सकस आहार आवश्यक त्या प्रमाणात देण्यात येतो. तसेच विद्यार्थ्यांच्या आहार व आरोग्याकडे लक्ष देण्याबाबत मासिक बैठकांमध्ये वेळोवेळी मुख्याध्यापकांना सुचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर विद्यार्थीनीचा मृत्यू कुपोषणामुळे झाल्याचे निदर्शनास येत नाही.

मृत विद्यार्थीनीच्या पालकांना शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे रुपये २,००,०००/- (रु.दोन लक्ष फक्त) इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचगड (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृह इमारतीच्या बांधकामाबाबत

**(१९) * १३०४२० श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचगड (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह इमारतीच्या बांधकामासाठी अंदाजपत्रक आदिवासी विभागाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावर निर्णय घेऊन मंजूरी व्हावी यासाठी आमगांव येथील लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) चिचगड ता.देवरी, जिल्हा गोंदिया येथे आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने सदर अंदाजपत्रके तांत्रिक तपासणीसाठी मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष आदिवासी विकास विभाग यांच्याकडे पाठविण्यात आले होते. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष आदिवासी विकास विभाग यांच्याकडून सदर अंदाजपत्रकांची तांत्रिक तपासणी करण्यात आली असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

-----------------

## राज्यात विजेच्या सिंगल फेज मीटर्सची कमतरता असल्याबाबत

**(२०) * १२६६६१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ३ लाख ९१ हजारांहून अधिक ग्राहकांनी पैसे भरुनदेखील त्यांना वीज मिटर्स उपलब्ध करुन दिले जात नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ‘चोवीस तासात नवीन वीज जोडणी, नादुरुस्त मीटर महिनाभरात बदला’ ही महावितरण कंपनीने जाहीर केलेली योजना प्रत्यक्षात अंमलात येत नसून जिल्ह्यातील सर्वच उपविभागीय कार्यालयात मीटरचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्हयात देखील महावितरणकडे वीज मीटरचा तुटवडा असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ दरम्यान आढळून आले असून जिल्हयात घरगुती व व्यावसायिक असे एकूण १० हजार १९६ ग्राहक पैसे भरुनदेखील त्यांना वीज मीटर्स उपलब्ध करुन दिले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार वीज ग्राहकांना मीटर्स त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. तथापि, सौभाग्य योजनेमध्ये विहित कालावधीत नवीन वीज जोडण्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता, उपलब्ध मीटर साठयामधून सौभाग्य लाभार्थीना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

दिनांक ११.१०.२०१७ ते दिनांक ११.११.२०१८ पर्यंत सौभाग्य योजनेअंतर्गत ८,३३,८८९ इतक्या वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(२) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये केवळ सर्व्हीस वायरद्वारे वीज जोडणी देणे शक्य असलेल्या ठिकाणी २४ तासांत वीज जोडणी, नादुरुस्त मीटर महिनाभरात बदलणे याकरिता कोल्हापूर, गडहिंग्लज, इचलकरंजी व जयसिंगपूर या शहरांची निवड केली आहे व त्यानुसार त्यांना मीटर्स उपलब्ध करुन दिली जात आहेत.

(३) व (४) जानेवारी, २०१८ ते ऑगस्ट, २०१८ दरम्यान महावितरणतर्फे संपूर्ण राज्यात १३.०६ लक्ष मीटर्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठा समाजास शासकीय नोकरी आणि शिक्षणामध्ये आरक्षण देण्याबाबत

**(२१) * १२६४७२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी),**

**श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजास शासकीय नोकरी आणि शिक्षणामध्ये १६ टक्के आरक्षण देणे संदर्भात दिनांक २१ नोव्हेंबर पर्यंत राज्य शासनाने निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वय समितीने राज्य शासनास दिनांक ९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा आरक्षणासंदर्भात मागास वर्ग आयोगाने राज्य भरातील सुमारे ४५ हजार मराठा कुटूंबाचे सर्वेक्षण केले असून आयोग दि.१५ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत अंतिम अहवाल सादर करेल अशी माहिती राज्य शासनाने मा=उच्च न्यायालयात दिली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीसाठी दिनांक २४ व २५ जुलै, २०१८ या दिवशी मराठा समाजाच्या मागण्यांसाठी "महाराष्ट्र बंद" आयोजित करण्यात आला होता व सदर "महाराष्ट्र बंद" मध्ये शासनाच्या व खाजगी गाड्यांची आंदोलकांनी मोडतोड केली असून त्यात किती आर्थिक नुकसान झाले आहे,

(४) असल्यास, बंदच्या आयोजकांकडून किती नुकसान भरपाई वसूल केली आहे व खासगी गाड्यांच्या मालकांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(५) तसेच या बंदच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्हयातील कायगाव टोका येथे गोदापात्रात आंदोलन सुरु असताना श्री.काकासाहेब शिंदे (वय, २८ वर्षे) यांनी गोदापात्रात उडी घेऊन आत्महत्या केली असल्याची बाब दिनांक २३ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार आरक्षणाकरिता होत असलेल्या आत्महत्या रोखण्याकरिता तसेच आरक्षणाच्या होणाऱ्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

मराठा आरक्षणासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने राज्यभरातील सुमारे ४३६२९ मराठा कुटूंबाचे सर्वेक्षण केले आहे.

(३) मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान राज्यात शासकीय व खाजगी गाड्यांची आंदोलकांनी मोडतोड केली असून त्यात सुमारे रु.७९,४६,६६,५४२/- इतके आर्थिक नुकसान झालेले आहे.

(४) मराठा आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याबाबत शासन निर्णय दि.२६/१०/२०१८ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) औरंगाबाद ग्रामीण जिल्हयातील कायगाव कोटा येथे गोदापात्रात आंदोलन सुरु असतांना श्री.काकासाहेब शिंदे यांनी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे.

(६) मराठा आरक्षणविषयक प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे. मराठा आरक्षणासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत यथोचित कार्यवाही करण्यात येईल. प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला (जि.अकोला) येथील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या विकास योजनेंतर्गत मागासवर्गीय वस्त्यांच्या विकासाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * १२९७३२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या विकासयोजनेंतर्गत मागासवर्गीय वस्त्यांचा सन २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार करुन गट विकास अधिकारी यांनी मान्यतेसाठी पाठविला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी गत चार वर्षापासून प्रलंबित व अखर्चित राहिल्याने गट विकास अधिकारी यांचेवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच मागासवर्गीय वस्त्यांच्या विकासाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही,
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोर्डा (जि.चंद्रपूर) येथील शासकीय आश्रमशाळेतील प्रकल्प कार्यालयात जीवनोपयोगी साहित्याचे वाटप न केल्याबाबत

**(२३) * १२९६४३ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील बोर्डा येथील शासकीय आश्रमशाळेतील प्रकल्प कार्यालयाच्या गोडाऊनमधील गरजू विद्यार्थी, महिला, शेतकरी यांच्याकरिता असलेल्या जीवनोपयोगी साहित्याचे वाटप सन २०१२ पासून केले गेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वाटप न केलेल्या अधिकाऱ्यांची आयुक्तांमार्फत चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित जबाबदार अधिक-यांची आदिवासी आयुक्तांमार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार याप्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप योग्यरीतीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांनी आढावा घेतला असून लाभार्थ्यांचे अर्ज अप्राप्त असणे, अपुर्ण कागदपत्रे, लाभार्थ्यांनी त्यांचा हिस्सा न भरणे, लाभार्थ्यांनी वस्तूंची उचल न करणे, योजनांच्या काही अटी शर्तींमुळे लाभार्थी अपात्र ठरणे व काही योजना थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने राबविण्याचा निर्णय झाल्याने साहित्य विना वाटप राहिल्याचे दिसून येते.

साहित्य विना वाटप राहण्याच्या वरील कारणांचा व याखेरीज अन्य ठिकाणी साहित्य विना वाटप राहण्याच्या कारणांचा आढावा घेवून सदर साहित्याचा योग्य विनियोग व्हावा यासाठी सर्वंकष सुचना संबंधित यंत्रणांना शासनस्तरावरुन देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ५२८ आश्रमशाळांमध्ये मुलांना सकस आहार योजनेंतर्गत टेट्रापॅकिंग दूध पुरविण्याच्या योजनेबाबत

**(२४) * १२६४२९ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५२८ आश्रमशाळांमध्ये मुलांना सकस आहार देण्याच्या योजनेतंर्गत दररोज महानंदाचे ४५ हजार लिटर टेट्रापॅकिंग दूध पुरविण्याच्या योजनेला राज्य शासनाने मंजुरी देऊनही अद्याप दूध खरेदीबाबत आदिवासी विकास विभागाने अंतिम निर्णय घेतला नसल्याने आश्रमशाळेतील मुलांना दूध पुरवठा होऊ शकला नसल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभर दूध वितरकांची नियुक्ती केली असतानाही निर्णय घेण्यास आदिवासी विकास विभागास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत त्वरित निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

आश्रमशाळांना टेट्रापॅक व्दारे दुधपुरवठा करण्याबाबत महानंदच्या कुठल्याही योजनेला शासनाने मंजुरी दिलेली नाही. सध्यस्थितीत आदिवासी विकास विभागांतर्गत येत असलेल्या शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना दररोज २५० मि.ली. दुध पुरवठा करणेसाठी प्रकल्प कार्यालय स्तरावरुन दुध पुरवठयासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवुन विविध पुरवठादाराकडून दुध पुरवठा सुरु आहे.

(२) व (३) राज्यातील सर्व आश्रमशाळांना एकाच पुरवठादाराकडून समान गुणवत्तेचे टेट्रापॅकव्दारे दुधपुरवठा करण्यासाठी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या स्तरावरून ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असून त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## सावरखेड तेजन (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्याने कर्जमाफी यादीत नाव नसल्याने केलेली आत्महत्या

**(२५) * १२६८८१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरखेड तेजन (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील श्री.गजानन अर्जुन जायभाये (वय ३९) या शेतकऱ्याने कर्जमाफी यादीत नाव नसल्याने तसेच पुन्हा पीक कर्ज मिळाले नसल्याने आर्थिक संकटामुळे सरण रचून विष पिऊन आत्महत्या केली असल्याचे दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने श्री.जायभाये यांच्या कुटुंबाला आर्थिक लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) श्री.गजानन अर्जुन जायभाये हे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा सिंदखेड राजा या बँकेचे खातेदार/कर्जदार सभासद असून सदर शाखेत त्यांची दोन कर्ज खाती आहेत. श्री.जायभाये यांना दि.१७/९/२०१५ रोजी वाटप झालेल्या खाते क्र.६०२४९४०५२९२ या कर्जखात्याला दि.११/६/२०१८ रोजी रु.३१,५०२.८३ इतकी कर्जमाफी देण्यात आलेली आहे. तथापी, दुसरे कर्जखाते क्र.६०२५१२३५७४५ असुन सदर कर्जाचे वाटप दि.१७/६/२०१६ रोजी झालेले असल्याने ते दि.१ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २०१६ या कर्जमाफी योजनेच्या निकषामध्ये बसत नसल्याने लाभास अपात्र आहे व त्या कर्जाची थकीत रक्कम रु.४२,८२६/- बाकी आहे. त्यामुळे श्री. जायभाये यांनी कर्जमाफी यादीत नाव नसल्यामुळे आत्महत्या केली हे खरे नाही.

(२) व (३) सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीच्या अनुषंगाने दि.७.०८.२०१८ रोजीच्या शेतकरी आत्महत्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत श्री.जायभाये यांच्या कुटूंबाला शासन मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. त्यानुसार आत्महत्याग्रस्त शेतकरी यांचे वारस पत्नी श्रीमती यशोदा गजानन जायभाये यांना दि.२७.०८.२०१८ रोजी तहसिल कार्यालय, सिंदखेड राजा यांचेमार्फत रु.१ लाख वितरित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्हयात नाफेडने खरेदी केलेल्या तूर व हरभऱ्याच्या चुकाऱ्याची रक्कम शासनाकडे थकित असल्याबाबत

**(२६) * १२७१२५ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नाफेडमार्फत मेहकर तालुक्यातील (जि.बुलढाणा) शेतकऱ्यांची हरभरा व तूर खरेदी केली मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने अनेक शेतकरी अडचणीत आले असून दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ रोजी मेहकर येथील खरेदी-विक्री संघ कार्यालयावर या शेतकऱ्यांनी आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१७-१८ मध्ये नाफेड अंतर्गत दत्तापूर (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) खरेदी विक्री सहकारी संस्थेने तूर व हरभरा यांची खरेदी केली असून तूर उत्पादक ३८५ शेतकऱ्यांना व हरभरा उत्पादक ६६९ शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत रक्कम मिळाली नसल्याचे माहे जुलै, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांनी किमान आधारभूत किमत योजनेतंर्गत हंगाम २०१७-१८ मध्ये NeML पोर्टलवर नोंदणी केलेल्या परंतु गोदाम उपलब्ध नाहीत ह्या कारणाखाली नाफेडने खरेदी बंद केल्यामुळे शिल्लक राहिलेल्या तूर व हरभरा उत्पादित शेतकऱ्यांच्या मालाला प्रती क्विंटल १००० रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने दिनांक १९ जून २०१८ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मात्र सदरचे अनुदान अद्यापही वाटप न झाल्यामुळे हे प्रलंबित अनुदान वितरीत करण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले, त्यानुसार राज्यातील तूर व हरभरा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात प्रलंबित रक्कम तातडीने जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) नाही.

(२) होय.

(३) होय.

हंगाम २०१७-१८ मध्ये राज्यात तूर व हरभरा खरेदीसाठी ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.परंतू त्यांच्याकडून तूर अथवा हरभरा खरेदी केलेला नाही अशा शेतकऱ्यांना रुपये १०००/-प्रति क्विंटल या प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

(४) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे माहे दिनांक ०१/१०/२०१८ च्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे

(५) शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी केलेल्या NeMLपोर्टलमधील तांत्रिक बिघाडामुळे खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या मालाच्या नोंदी करणे प्रलंबित होते.यासाठी केंद्रशासनाची मान्यता घेऊन सदर प्रलंबित नोंदी NeML पोर्टलवर करण्यात आल्यानंतर शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत.

तसेच तूर उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १००० प्रति क्विंटल अनुदानांतर्गत १२७८६ शेतकऱ्यांना रुपये १३.८३ कोटी ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात आले आहेत.

त्याचबरोबर हरभरा उत्पादक शेतकऱ्यांची नमूद माहितीची उदा. बँक खाते, आधारक्रमांक इ.ची खातरजमा करुन निधी वितरीत करण्याचे काम सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या अल्प व्याजदराच्या योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(२७) * १२८६८६ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीतील बेरोजगार युवकांसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या अल्प व्याजदराच्या योजना गत ४ वर्षांपासून बंद असल्याचे दिनांक २३ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून केंद्र शासनाला सुमारे ३२ कोटी रुपयांची हमी न दिल्याने सदर योजना बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर योजना पुर्ववत सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळाचे लेखे विधानमंडळास सादर करावयाचे प्रलंबित असल्याने शासनाकडून सदर योजनेसाठी हमी देण्यात आलेली नाही. त्यामुळे नविन योजनांसाठी केंद्र शासनाच्या वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध होत नाही. परंतु सदर लेखे पूर्ण करून विधीमंडळास लेखे करण्याची कार्यवाही सुरू असून शासन हमी प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील झेनित रबर कंपनीला लागलेल्या आगीबाबत

**(२८) * १२९७५१ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील झेनित रबर कंपनीमध्ये दिनांक ८ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून कंपनीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये आग लागल्याने कंपनीमध्ये कामाला असलेल्या सुमारे ३०० कामगारांवर बेरोजगारीचे संकट उद्‌भवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झेनित रबर कंपनीला आग लागण्याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने सदर प्रकरणी कंपनीच्या कामगारांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही

(३) व (४) होय.

सदर कंपनीच्या कारखान्यातील रबर मटेरीयल पॅकींग सेक्शनचे काम बंद झाल्यावर तयार मालाच्या सुरक्षेसाठी गोडाऊनमध्ये विद्युत पुरवठा सुरु होता व सर्व विज दिवे प्रकाशीत स्थितीत होते. तेथे रात्रौ ११.०५ वा. च्या दरम्यान सुमारे १० वर्ष जुन्या असलेले विद्युत संचमांडणीतील ३ पिन प्लग स्विचबोर्डामध्ये शॉटसर्किट झाल्याने ठिणग्या निर्माण होऊन त्या खाली ठेवलेल्या तयार झालेल्या मालाच्या पॅकिंगवर पडून पॅकिंगने पेट घेतला व आग इतरत्र पसरत गेली.

सदर आगीच्या घटनेसंदर्भात सदर कंपनीस वीजसंचमांडणीतील त्रुटी निरीकरण नवीनीकरण करणेसाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच सदर कंपनीतील ५६ कर्मचाऱ्यांना कंपनीच्या इतर विभागात सामावून घेतले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात महावितरणच्या नव्या तंत्रज्ञानाच्या मीटरने ग्राहकांना आर्थिक भार येत असल्याबाबत

**(२९) * १२९९९२ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महावितरणकडून वीज देयकातील मानवी हस्तक्षेप टाळावा, अचूक देयकांचे वाटप व्हावे आणि महसुलात वाढ व्हावी या हेतूने 'आयआर' (इन्फ्रा रेड) आणि 'आरएफ' (रेडीओ फ्रिक्वेन्सी) मीटर बसवले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडून मीटर बसविल्यानंतर तो नादुरुस्त झाल्यास त्याच्या मोबदल्यात नवीन मीटर बसविताना पूर्वी जास्तीत जास्त सातशे रुपये खर्च येत होता, आता मात्र 'आयआर' (रु.७५०) आणि 'आरएफ' (रु.१५००) याप्रमाणे रुपये ग्राहकांना भरावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन मीटर बसवूनही जुन्या पद्धतीने देयकांचे रीडिंग घेतले जात असून सुमारे हजार कोटी रुपयांचा नाहक खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी ठरवून दिलेल्या वीज दर आदेशानुसार व महावितरणच्या दिनांक ०८.१०.२०१८ च्या परिपत्रकानुसार, जळालेला मीटर बदलून नवीन मीटर बसविण्यासाठी साध्या मीटरसाठी रु.६००/- व आरएफ मीटरसाठी रु.१५००/- किंमत निर्धारित केली आहे.

(३) हे खरे नाही.

वीज ग्राहकांचे अचूक मीटर वाचन करुन ती वीज बिले ग्राहकांना विहीत वेळेत मिळण्याकरिता महावितरणने दिनांक १ ऑगस्ट, २०१८ पासून नवीन केंद्रीय वीज बिल प्रणाली कार्यान्वित केली असून त्या प्रणालीनुसार वीज ग्राहकांचे मीटर वाचन मोबाईल ॲप मध्ये घेऊन त्यांना वीज बिल अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाकरीता स्वतंत्र इमारत मंजूर करुन वसतीगृहातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) * १२८०४६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील १७ मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांपैकी १३ वसतीगृहातील गृहपालाची पदे रिक्त असल्याने जिल्हयातील किमान १५०० विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर सोयी-सुविधांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मंजूर १७ वसतीगृहापैकी १० वसतीगृहे ही भाड्याच्या इमारतीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने मागासवर्गीय वसतीगृहातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच वसतीगृहाकरीता स्वतंत्र इमारत मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत बुलढाणा जिल्हयातील १७ मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांपैकी १२ वसतीगृहातील गृहपालांची पदे रिक्त आहेत. तथापी रिक्त

पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य सक्षम कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून सर्व वसतिगृहांचे नियमित कामकाज सुरळीतपणे सुरू आहे.

(२) व (३) होय.

बुलढाणा जिल्ह्यातील १७ वसतीगृहांपैकी १० वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत सुरू असून या वसतिगृहांकरिता शासकीय जमीन / इमारत उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) वित्त विभाग, शासन निर्णय दि.२.६.२०१५ अन्वये सरळसेवेव्दारे पदे भरण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. तथापी, अत्यावश्यक बाब म्हणून सरळसेवा कोट्यातील रिक्त पदांच्या ५० टक्के पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. तथापी, त्यास मान्यता देण्यात आली नाही.

मुलींच्या सुरक्षिततेसाठी तातडीने गृहपालाची रिक्त पदे बाह्यस्त्रोताव्दारे भरण्याची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात २०० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची निवडणूक संस्थेच्या सर्वसाधारण सभेत घेण्याच्या निर्णयाबाबत

**(३१) * १२७६७६ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २०० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची निवडणूक आयोगाकडून न घेता संस्थेच्या सर्व साधारण सभेत निवडणूक घेण्याच्या मंत्रीमंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी सहकार विभागाकडून होत नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पुणे व अनेक शहरातील दोनशेपेक्षा कमी सभासद असलेल्या संस्थांनी निवडणूक प्रक्रिया सुरू न केल्याने संस्थांचे लेखी परीक्षा

अहवाल सहकार उपनिबंधक कार्यालयात स्वीकारले जात नसल्याने, संस्थांना लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेत मांडण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवाल सर्वसाधारण सभेत मांडता न आल्याने संस्थांना निवडणूका घेण्यात देखील अडचणी निर्माण होत असून, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, आहे,

(४) असल्यास, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने दोनशेपेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची निवडणूक सर्वसाधारण सभेत घेण्याबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) राज्यात २०० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका आयोगाकडून न घेता संस्थेच्या सर्वसाधारण सभेत घेण्याच्या मंत्रीमंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी नव्याने प्रकरण समाविष्ट करणे व कलम ७३ कब मध्ये सुधारणा करण्याचा अध्यादेश दिनांक ३०/१०/२०१८ रोजी प्रख्यापित करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषिपंपाना उच्चदाब वीज जोडणी देण्याची योजना कंत्राटदारांनी सहभाग न घेतल्यामुळे प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * १२९३४३ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड**

**उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषिपंपाना उच्चदाब वीज जोडणी देण्याची सुमारे ५ हजार ४८ कोटी रुपयांची योजना कंत्राटदारांनी सहभाग न घेतल्यामुळे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या निविदेत बाजारभावाच्या तुलनेत २० टक्के दर कमी ठेवल्यामुळे कंत्राटदारांनी या निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात बाजारभावाचे मुल्यांकन करावे व त्यानुसार दरसूची ठरविण्याबाबत व सदर योजना तातडीने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

राज्यात उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत जुलै, २०१८ मध्ये महावितरणच्या ३७ मंडळ कार्यालयाअंतर्गत ८२२ निविदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. त्यापैकी फक्त अकोला, अमरावती, यवतमाळ व वाशिम ह्या ४ मंडळ कार्यालयांतर्गत निविदेस प्रतिसाद मिळाला होता.

(२) हे खरे नाही.

परंतु स्टील, ॲल्युमिनियम व कॉपर या धातूंच्या किमतीत अचानक वाढ झाल्याने हा फरक पडल्याचे दिसून येते.

(३) मार्च, २०१८ नंतर स्टील, ॲल्युमिनियम व कॉपर या धातूच्या किंमतीमध्ये साधारणत: २० ते २२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार दर सूची मधील संबंधित धातूच्या किंमतीमध्ये वाढ करण्यात आली असून ही वाढ साधारणत: २० टक्के इतकी आहे.

त्यानंतर उच्च दाब वितरण प्रणालीच्या अंशत: टर्नकी ई-निविदा प्रक्रियेस कंत्राटदारांचा मिळालेला प्रतिसाद पाहता महावितरणच्या २९ मंडळ कार्यालय अंतर्गत ४५५ कार्यादेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नावावर परस्पर कर्ज काढून झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३३) * १२९९३१ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील ४३ शेतकऱ्यांच्या नावाने प्रत्येकी ४५ ते ५६ लाखांचे कर्ज कॉर्पोरेशन बँकेतून परस्पर काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.प्रकाश डंगारे यांनी सदर बँकेकडे कर्जाची मागणी केलेली नसतानाही त्यांना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान कॉर्पोरेशन बँकेकडून ४५ लाख रूपयांचे कर्ज सन २०१७ मध्ये घेण्यात आले असून व्याजासह रुपये ५२,१६,०२८/- इतकी रक्कम भरण्यात यावी, अशी नोटीस बँकेकडून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नोटीस मिळाल्यानंतर गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी ११ फिर्यादींच्या तक्रारीवरून प्रथमदर्शनी रु.५.२४ कोटी रकमेची फसवणूक झाल्याची दिसून आल्याने ७ आरोपींविरूद्ध दि.२२.१०.२०१८ रोजी पोलीस स्टेशन, जलालखेडा

येथे अप.नं. ३०४/१८ भादंवि कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण मार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू आदिवासी प्रकल्पांतर्गत (जि.पालघर) असलेल्या वसतीगृहामध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु केल्याने विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय

**(३४) * १२८३३८ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत असलेल्या वसतीगृहामध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु केल्यामुळे त्यात सहभाग नोंदविणे आदिवासी विद्यार्थ्यांना कठीण जात असल्याने डहाणू प्रकल्पातील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेश प्रक्रियेत अर्ज भरल्यानंतर प्रवेशास पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली नसल्यामुळे डी.एड, इंजिनिअरींग व तत्सम व्यावसायिक शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरु होऊन दिड महिन्याचा कालावधी उलटूनसूध्दा विद्यार्थी वसतीगृहाच्या प्रवेशापासून वंचित असल्याने त्यांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतीगृहाच्या प्रवेशाकरिता सुटसूटीत प्रक्रिया सुरु करुन विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) डहाणू प्रकल्पाअंतर्गत असलेल्या एकूण १७ वसतीगृहांची प्रवेश क्षमता १४५० असून वसतीगृहांच्या प्रवेशासाठी एकूण १८८९ ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी आतापर्यंत १२९८ विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आलेला आहे. इमारतीच्या उपलब्ध क्षमतेनुसार उर्वरीत पात्र १५२ विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२) डहाणू प्रकल्पा अंतर्गत १७ वसतीगृहांमध्ये अभ्यासक्रमानुसार प्रवेशासाठी गुणवत्ता यादी लावण्यात आलेली आहे.
(३) वसतीगृह प्रवेशासाठीची ऑनलाईन प्रवेश प्रकिया मागील ४ वर्षापासून राबिवण्यात येत आहे. वसतीगृहामध्ये अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्याबाबत

**(३५) * १२६६०५ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४३५ मागासवर्गीय वसतिगृहातील ४५ हजार विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्याचे कंत्राट माहे एप्रिल, २०१८ मध्ये संपलेले असतांना देखील सदरील कंत्राटदाराने माहे ऑगस्ट, २०१८ पर्यंत विद्यार्थ्यांना भोजन पुरविले असून त्यांना माहे एप्रिल, २०१८ नंतर पुरविलेल्या भोजनाची देयके अदा करण्यात येऊ नये अशा प्रकारचे आदेश समाजकल्याण आयुक्तालयाचे सहआयुक्त यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उक्त आदेश काढल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने संबधित कंत्राटदारांने पुरविण्यात आलेल्या भोजनाची देयक अदा करण्याबाबत तसेच वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासाठी कंत्राटदार नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

भोजन पुरवठादाराची मुदत संपुष्टात आल्याने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी अशा स्वरूपाचे पत्र निर्गमित केले होते.

(२) नाही.

(३) नाही.

(४) कंत्राटदाराकडून पुरविण्यात आलेल्या भोजनाची देयके अदा करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी दि. २४.८.२०१८ रोजी सुधारीत पत्र निर्गमीत केलेले आहे.

तसेच वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी भोजनपुरवठा करण्यासंदर्भात निविदा प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन पुरवठादारांची निवड अंतीम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.पुणे) येथील प्रज्ञानबोधिनी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांचे इतर शाळेत समायोजन करण्याबाबत

**(३६) * १२७१२० श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातंर्गत चालविण्यात येणाऱ्या पुणे जिल्हयातील चिखली येथील प्रज्ञानबोधिनी नामांकित इंग्लिश मिडियम शाळेची मान्यता शासनाने रद्द केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे दुसऱ्या शाळेत अद्यापही समायोजन केले नसल्याने विद्यार्थ्यांच्या पालकांनी जव्हार आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये विद्यार्थ्यांसमवेत बेमुदत आमरण उपोषण सुरु केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यांत आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर विद्यार्थ्यांना शैक्षणिक व अन्य सोयीसुविधा पुरविण्याबाबत तसेच ६३ मुलांचे समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रज्ञान बोधिनी इंग्लिश मिडीयम स्कूल, चिखली, जि.पूणे येथे सन २०१७-१८ मध्ये प्रवेशित असलेले ६३ विद्यार्थ्यांचे समायोजन दिनांक १४.८.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये आत्मा मलिक इंग्लिश मिडीयम स्कूल, अघई, ता.शहापूर या नामांकित शाळेमध्ये करण्यात आले आहे. दिनांक १६.८.२०१८ पासून ६३ विद्यार्थी आत्मा मलिक इंग्लिश मिडीयम स्कूल, अघई, ता.शहापूर या नामांकित शाळेमध्ये प्रवेशित झालेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील आदिवासी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय

**(३७) * १३२११० डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील आदिवासी प्रकल्पांतर्गत २८ खाजगी अनुदानित आश्रमशाळा, १७ शासकीय आश्रमशाळा व १९ आदिवासी शासकिय वसतीगृहे असून त्यामध्ये १० मुलांचे व ९ मुलींच्या वसतीगृहाचा समावेश असताना अनेक वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांच्या निवासाची अपूरी व्यवस्था असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतीगृहाची दारे, खिडक्या व तावदाने तुटलेली असुन, स्वच्छतागृहाची दुरवस्था झालेली असणे इत्यादी समस्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार योग्य त्या सुविधा देण्याबाबत, कामाचा दर्जा योग्य राखण्याबाबत व प्रशासनामधील बेजबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) पांढरकवडा (ता.केळापूर जि.यवतमाळ) येथील आदिवासी प्रकल्पाअंतर्गत २८ खाजगी अनुदानित आश्रमशाळा, १७ शासकीय आश्रमशाळा व १९ आदिवासी शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा अंतर्गत एकूण १९ वसतीगृहे कार्यरत असून ४ वसतीगृहे शासकीय इमारतीत आहे. तसेच शासकीय वसतीगृहांच्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती यांच्यामार्फत सुरु आहे.

उर्वरीत १५ वसतीगृहे हे भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत असून इमारत मालकांना आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दमण बनावटीच्या दारु आणि बिअर बॉटलचे झाकण बदलून दारु विकणा-या टोळीला केलेली अटक

**(३८) * १३२२०८ श्री.अमित घोडा (पालघर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमण बनावटीच्या दारु आणि बिअर बॉटलचे झाकण बदलून ती राज्यात विकणा-या एका टोळीला पालघर जिल्हयामध्ये कारवाई करुन ठाणे राज्य उत्पादन शुल्क पथकाने चारोटी नाक्यावर दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटक करण्यात आलेल्या टोळीकडून एकूण १५ लाख ३९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल व ३ लाख ३९ हजार ४०० रुपयांची बनावट दारु हस्तगत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषीवंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, पालघर यांनी दि.१२.०८.२०१८ रोजी चारोटी टोलनाका, ता.डहाणू, जि.पालघर या ठिकाणी एका टेम्पोमधून परराज्यातील बेकायदेशीर मद्याची वाहतूक होत असल्याचा गुन्हा र.क्र. १६१/१८ नोंदविण्यात आला. यामध्ये तीन ठिकाणी छापे घालून रु.१८,१६,९६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(३) महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम १२, ६५(अ), (ई), ६८ (अ) (ब), ८१, ८३, ९० व १०८ नुसार एकूण ५ आरोपींवर गुन्हा नोंद असून इतर फरार आरोपींना अटक करण्याची कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात निर्माण झालेल्या वीज कपातीमुळे होत असलेले भारनियमन

**(३९) * १२६४४७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर**

**(तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विजेची मागणी वाढत असतानाच राज्यातील सुमारे २१०० मेगावॅट वीजनिर्मिती संच कोळशाच्या तुटवड्यामुळे बंद पडले असून केंद्राकडून ठरवून दिलेल्या कोट्यापेक्षा जास्त वीज घेतल्यानंतरही मागणी आणि पुरवठा यामधील तुट भरून काढणे शक्य नसून नॅशनल पॉवर एक्स्चेंजवरून काही राज्ये त्यांच्या राज्यातील भारनियमन टाळण्यासाठी चढ्या भावाने वीज खरेदी करत असल्याने राज्यास वीज मिळणे कठीण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सद्य:स्थितीत ७०० ते ८०० मेगावॅट विजेचा तुटवडा निर्माण झालेला असल्याने जी १, २, ३ या गटांत भारनियमन सुरु करण्यात आले असल्याने त्याचा विपरित परिणाम राज्यातील शेतकरी व व्यावसायिकांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भारनियमनाचा शेतकऱ्यांना त्रास होत असताना जळलेले रोहित्र शेतकऱ्यांना बदलून देण्यासाठी विजबिलाची थकबाकी भरण्याची सक्ती करणारे आदेश शासनाने माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यासुमारास काढले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बिल न भरल्यास शेतकऱ्यांना रोहित्र स्वखर्चाने बसवावे लागत असल्याचे ही निदर्शनास आले असून शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार भारनियमनापासून राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी व रोहित्र दुरुस्ती करताना विजबिलाची थकबाकी भरण्याच्या सक्तीचा पुनर्विचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मा.वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार वाणिज्यिक व वितरण हानी ५८% पेक्षा अधिक असलेल्या “ग” गटातील वाहिन्यांवर गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले. परंतु कृषि वीज वाहिन्यांवर आयोगाच्या निर्देशानुसार दिवसा ०८ तास व रात्री ०८ तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(३) थकबाकी वसुलीबाबत महावितरण कंपनीकडून दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

(४) हे खरे नाही.

जळालेले रोहित्र महावितरण कंपनीतर्फे बदलण्यात येते.

(५) सदर थकबाकी वसुलीच्या आदेशाला ऑक्टोबर, २०१८ मध्ये तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १० साखर कारखान्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर जप्तीच्या सुरु केलेल्या कारबाईबाबत

**(४०) * १२८८०४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांनी १५ जून अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे १५४३ कोटी २० लाख रुपये थकविले असल्याने सतत नोटिसा बजावूनही एफ.आर.पी.ची रक्कम शेतकऱ्यांना देण्यास टाळाटाळ करणाऱ्या १० साखर कारखान्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्याची कारवाई साखर आयुक्तांनी माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यासुमारास सुरु केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफ.आर.पी.ची रक्कम देण्याबाबत तसेच साखर कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.

हंगाम २०१७-१८ मध्ये दि. १५ जून-२०१८ अखेर देय FRP पोटी १०२ साखर कारखान्यांकडे रु.१५४३.२० कोटी तर माहे जूलै २०१८ अखेर ५६ कारखान्यांकडे रु.५९३.५८ कोटी रक्कम थकीत होती. थकीत FRP संदर्भात संबंधीत कारखान्यांची सुनावण्या घेण्यात येवून त्यांना शेतकऱ्यांची थकबाकी त्वरीत भरणा करणेस सुचीत करण्यात आले होते. तद्नंतरही एफ.आर.पी. थकविणाऱ्या १३ कारखान्यांवर माहे जुलै २०१८ पर्यंत RRC कारवाई करण्यात आली आहे.

(३) सन २०१७-१८ हंगामाची एकूण देय FRP रु.२११७६.१३ कोटी असून फक्त रु.१०२.८६ कोटी थकीत असून थकबाकीचे प्रमाण ०.५ % इतके आहे. RRC केलेल्या १३ कारखान्यांपैकी १० कारखान्यांनी आर.आर.सी. ची संपुर्ण देयके ऊस पुरवठादारांना अदा केलेली आहेत. उर्वरित ३ कारखान्यांकडील थकबाकीबाबतची प्रकरणे मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, आजरा व गडहिंग्लज या तालुक्यातील ग्रामीण भागातील विदयुत खांब व डीपी संच बदलण्याबाबत

**(४१) * १२८४८३ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, आजरा व गडहिंग्लज या तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्युत खांब व डीपी संच फार जुने झाले असून केव्हाही कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून या तालुक्यातील विद्युतीकरणाच्या कामाचा आढावा घेऊन जुने गंजलेले खांब व डीपी संच बदलण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधींनी मा.उर्जामंत्री यांचेकडे दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महावितरण कंपनीचा उपविभाग सध्या चंदगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे कार्यरत आहे परंतु चंदगड तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता तेथील नागरिकांसाठी हे कार्यालय गैरसोयीचे असल्यामुळे या उपविभागाचे विभाजन करुन नविन उपविभाग मजरे कार्वे (ता.चंदगड) येथे स्थापित करावा अशी मागणी तेथील नागरीकांनी तसेच संबंधित लोकप्रतिनिधीनी मा.उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने चंदगड, आजरा व गडहिंग्लज तालुक्यातील विद्युत खांब व डीपी संच बदलण्याबाबत व मजरे कार्वे येथे नवीन उपविभाग स्थापन करण्याबाबत कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, आजरा, गडहिंग्लज तालुक्यातील गंजलेले ५८० विद्युत खांब बदलण्यात आले आहेत. तसेच २ डी.पी. संच बदलण्यात आले आहेत. तसेच १२५ गंजलेल्या वितरण पेट्या बदलण्यात आल्या आहेत. आजरा, गडहिंग्लज, चंदगड तालुक्यातील विद्युत वाहिनी व रोहित्र संच दुरुस्ती व देखभालीसाठी रु.१२.५ लाख रकमेच्या निविदेची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. हया तालुक्यातील वाहिन्या दुरुस्ती, गंजलेले पोल बदलणे इत्यादी दुरुस्तीच्या कामाचा रु.५१.०३ कोटीचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये चंदगड उपविभागाअंतर्गत ७ शाखा कार्यालये कार्यान्वित असून एकूण ग्राहक संख्या ५१४९५ आहे. महावितरण कंपनीच्या मानकातील तरतुदीनुसार उपविभाग निर्मितीसाठी आवश्यक वीज ग्राहक संख्येचा निकष पूर्ण होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यांमध्ये आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४२) * १२६९३५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमित घोडा (पालघर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वाडा व विक्रमगड तालुक्यांमध्ये आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेतील विकास कामांमध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा तालुक्यातील ७८ गावांसाठी सन २०१२ ते २०१५ दरम्यान ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतील १९१ विकासकामांसाठी १५ कोटी ३ लाख रूपये मंजूर करण्यात आले मात्र सदर कामांत सुमारे १२ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच विक्रमगड तालुक्यात ठक्कर बाप्पा वस्ती सुधारणा योजनेतून सन २०१२ ते २०१५ या कालावधीत तालुक्यातील ९४ गावांपैकी ८३ गावांमध्ये ३०४ विकासकामे मंजूर करण्यात येऊन त्यासाठी ३० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला मात्र यात गैरव्यवहार झाल्याचे सामाजिक कार्यकर्ते श्री. शरद पाटील यांनी माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी आयआयटीने केलेल्या चौकशी अहवालामध्ये ३०४ कामांपैकी एक काम प्रत्यक्ष सुरु झाले नाही, १०८ कामे प्रत्यक्षात स्थळावर मिळाली नाहीत, ५७ कामांची अंदाजपत्रकेच नाहीत, ९४ कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचे अहवालात नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या ३०४ कामांवर ३० कोटी रुपये खर्च झाला असला तरी प्रत्यक्षात १३ टक्केच कामे झाल्याने २६ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नमूद करुन प्रकल्प अधिकाऱ्यांनी या अहवालामध्ये एकच काम चार वेळा केल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने वाडा व विक्रमगड तालुक्यासोबतच पालघर जिल्हयात या योजनेतंर्गत झालेल्या कामांची अधिक चौकशी केली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, पालघर यांनी त्यांच्या दिनांक २२/३/२०१६ रोजीच्या आदेशान्वये योजनांचे मुल्यमापन करण्यासाठी संस्थांची निवड केली आहे. त्यानुसार ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारित कार्यक्रमाचे सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीचे सामाजिक लेखापरिक्षण आयआयटी, पवई यांच्याकडून करण्यात येत आहे. सदर संस्थेस जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या तालुक्यांतील कामे तपासणीसाठी देण्यात आली होती. त्यापैकी संस्थेकडून प्रत्यक्षात विक्रमगड मधील ३०३ व वाडा मधील १९१ (एकूण ४९४) कामांचे सामाजिक अंकेक्षण करण्यात आले आहे.

वाडा तालुक्यातील सन २०१२ ते २०१५ दरम्यान ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतील १८९ विकासकामांसाठी १४ कोटी ५९ लाख रूपये मंजूर करण्यात आले होते. तर विक्रमगड तालुक्यात ३०५

विकासकामांसाठी ३० कोटी ९६ लाख रूपये मंजूर करण्यात आले होते. सदर कामे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पालघर व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांच्या मार्फत करण्यात आलेली आहेत.

(४) व (५) आयआयटी, पवई यांनी केलेल्या सामाजिक अंकेक्षणात ४९४ कामांपैकी १२३ कामे आढळून आढळून आलेली नाहीत, १११ कामांची अंदाजपत्रके प्राप्त न झाल्याने त्यांची तपासणी करता आलेली नाही. १५१ कामे कमी दर्जाची आढळून आलेली आहेत, १ काम सुरु झालेले नाही तर ४ कामे दोनदा दाखविण्यात आलेली आहेत.

(६) नाही.

(७) याबाबत संबंधित यंत्रणांकडून लेखी खुलासा मागविण्यात आला असून सदर यंत्रणा दोषी असल्याचे आढळून आल्यास त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

-----------------

## शिधावाटप धारकांना स्वस्त धान्य दुकानातुन तूरडाळ वितरीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(४३) * १२६५४६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड**

**(अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय कदम (दापोली), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गतवर्षीच्या झालेले अतिरिक्त तूर उत्पादन व बाजारभाव कमी असल्याने शासनाने तूर डाळ खरेदी करुन ती राज्यातील स्वस्त धान्य दुकानातून शिधावाटप पत्रिकाधारकांना वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनामार्फत बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत तूरीची भरडाई केल्यानंतर डाळीची विक्री राज्यातील स्वस्त धान्य दूकानातून अधिक व्हावी या उद्देशाने प्रति किलो ५५ रुपये दराने विकण्याचा निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भरडाई पासून सुरु झालेला गैरव्यवहार आता तूर विक्रीपर्यंत पोहचला असून शासकीय दुकानातील तूर डाळीच्या पिशव्या फाडून नष्ट करण्यात आल्याने तुरीचा तुटवडा निर्माण करण्यात आला असून बाजारातील तूर डाळीचा भाव प्रति किलो ७० रुपयांपर्यंत पोहचला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी विक्रेता आणि पुरवठादारांनी संगनमताने हा गैरव्यवहार केला असून शासकीय तूर डाळीची रिकामी पाकिटे नवी मुंबईत सापडल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१८ रोजी निदर्शनास आले असून रायगड जिल्हा पुरवठा विभागाने घटनास्थळी काही पाकिटे जप्त करुन पंचनामा केला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कारवाई

करण्याबाबत व तूर डाळ शासकीय रेशन दुकानांवर योग्य भावात विक्री होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.
(२) होय
(३) नाही.
(४) व (५) जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांनी दिनांक ११/०८/२०१८ रोजी पूर्व द्रुतगती महामार्गावरील सर्व्हीस रोड जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड सिग्नलजवळ आढळुन आलेल्या तूरडाळीच्या रिकाम्या पाकीटांचा घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असता, घटनास्थळी ३ रिकामी पाकीटे आढळून आली. त्यामध्ये तूरडाळीचा एकही दाणा आढळून आलेला नाही. चौकशीमध्ये कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही. तद्नंतर प्रधान कार्यालयाचे फिरते पथक व ई-परिमंडळ कार्यालयांतर्गत शिधावाटप कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके स्थापन करुन त्या भागातील तपासणी केली असता, भांडुप व विक्रोळी शिधावाटप कार्यालयातून तूरडाळीची अनुक्रमे १००% व ९५% ऑनलाईन विक्री झालेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथे अनुसूचित जमातीच्या विद्‌यार्थ्यांना हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देताना एका संस्थेने केलेला गैरव्यवहार

**(४४) * १३१०१२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत शहापूर (जि.ठाणे) प्रकल्पात सन २०१६-१७ मध्ये अनुसूचित जमातीच्या ७८ बेरोजगार युवकांना हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देण्याकरिता कल्याण (जि.ठाणे) येथील एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांना हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने प्रति विद्यार्थी २५ हजार ६२० रुपये प्रमाणे सुमारे १९ लाख ९८ हजार ३६० रुपये सदर संस्थेला अदा केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ दोनच दिवस प्रशिक्षण देऊन तिसऱ्या दिवशी तीन महिन्यांच्या हजेरीपटावर लाभार्थ्यांच्या सह्या घेऊन प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी दोषी असणाऱ्या आदिवासी विभागातील अधिकाऱ्यांवर तसेच प्रशिक्षण दिल्याचे बनावट हजेरी पटावर दाखविणाऱ्या संस्थेवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) खरे आहे.

(३) खरे नाही.

शहापूर, एकात्मिक आदिवासी प्रकल्पातील अनुसूचित जमातीच्या ७५ प्रशिक्षणार्थ्यांना टाकीपठार, ता.शहापूर, जि.ठाणे येथे दि.१७/०२/२०१७ ते दि.९/०६/२०१७ या कालावधीत हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण व स्वंयपाकाचे किट देण्यात आले आहे. त्याबाबत संबंधित आदिवासी विकास निरिक्षक यांनी पडताळणी केलेली आहे.

(४) प्रकरणी आदिवासी कृती समिती, महाराष्ट्र यांच्या दि. ७/११/२०१७ रोजीच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहायक लेखाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करुन चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशीत काही लाभार्थ्यांना योजनेचे पूर्ण प्रशिक्षण मिळाले नसल्याचे आदिवासी कृती समिती, महाराष्ट्र या संस्थेच्या प्रतिनिधींनी नमूद केल्याने सदर लाभार्थ्यांसाठी पुन्हा प्रशिक्षण

देण्याच्या सुचना संबंधित संस्थेस देण्यात आल्या. त्यानुसार संस्थेने दि.२४/०८/२०१८ रोजी पुन्हा प्रशिक्षण आयोजित केले तथापि कोणीही लाभार्थी पुन:ह प्रशिक्षणास उपस्थित राहीला नाही. त्यामुळे संस्थेने लाभार्थ्यांशी पुन्हा संपर्क करुन प्रशिक्षण आयोजित करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महानिर्मिती कंपनीने गत ८ वर्षात कराराप्रमाणे एकही वीज प्रकल्प उभारला नसल्याबाबत

**(४५) * १२९५६३ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विजेच्या वाढत्या मागणीचा विचार करुन महावितरणने सन २०१० मध्ये महानिर्मितीबरोबर वीज खरेदी करार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार महानिर्मिती कंपनी सुमारे ९ हजार ५७० मेगावॅटचे नवीन वीज प्रकल्प उभारणार आहे, परंतु गेल्या ८ वर्षात महानिर्मितीने या करारातील एकही वीज प्रकल्प उभारलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्प न उभारण्याची कारणे काय आहेत व भविष्यात विजेची वाढणारी मागणी लक्षात घेता शासनाने सदर वीज प्रकल्प त्वरित उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

महावितरण कंपनीने महानिर्मिती कंपनीसोबत दिर्घ मुदतीचा वीज खरेदी करार दिनांक ०१.०४.२००९ रोजी केला आहे. दि.२४.१२.२०१० रोजी पूरकपत्र १ जारी झाले व दि.१७.०४.२०१३ रोजी पूरकपत्र २ जारी करण्यात आले.

(२) महानिर्मिती कंपनीने गेल्या ८ वर्षात १४,८०० मे.वॅ. पैकी ५,२३० मे.वॅ. क्षमतेचे ११ प्रकल्प उभारले आहेत व त्याव्दारे वीज निर्मिती सुरु आहे.

(३) व (४) दीर्घ मुदतीमध्ये वीज खरेदी करारातील इतर ११ प्रकल्प वेगवेगळया कारणांमुळे जसे मुलभूत गरजा अभावी तसेच वैधानिक मंजुरी अभावी स्थगित किंवा रद्द केले आहेत. तसेच भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र संच क्र.६ (६६० मे.वॅ.) प्रकल्पाचे आदेश मे. भेल, नवी दिल्ली यांना दिले आहेत. सदर प्रकल्पाव्दारे सन २०२१-२२ मध्ये क्षमता वाढ होणे अपेक्षित आहे.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध प्राधिकरणांनी महावितरणची विजेच्या देयकांची रक्कम थकविल्याबाबत

**(४६) * १२७८२४ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर),**

**श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध महानगरपालिकांसह अनेक प्राधिकरणांनी महावितरणची विजेच्या देयकांची एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम थकविल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर थकबाकीची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

माहे ऑगस्ट २०१८ अखेर शासनाची विविध कार्यालये तसेच महानगरपालिका/नगरपालिका/ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या वीजेच्या देयकाची एकूण रु.५६५७ कोटी (व्याज व दंडासहित) इतकी रक्कम थकीत आहे.

(२) स्थानिक स्तरावर महावितरणच्या अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी थकबाकी भरण्याबाबत सदर प्राधिकरणांकडे पाठपुरावा करण्यात येतो. तसेच वीज बिल थकीत असलेल्या शासनाच्या विविध प्राधिकरणास वीज कायदा, २००३ कलम ५६ नुसार वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीस देऊन वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करण्यात येते.

(३) शासन निर्णय क्रमांक वीदेव २०१८/प्र.क्र.१०/ऊर्जा-५ दिनांक १६.०५.२०१८ अनुसार शासनाच्या पाणीपुरवठा व पथदिवे ग्राहकांकडे ३१ मार्च २०१८ अखेर असलेल्या मूळ थकबाकीपैकी ५०% रक्कम चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून संबंधित विभागामार्फत महावितरण कंपनीस द्यावयाची असून उर्वरित ५०% रक्कम व एप्रिल २०१८ पासूनची चालू देयके संबंधित शासकीय

ग्राहकांनी महावितरण कंपनीकडे भरावयाची आहेत. मूळ थकबाकीच्या ५०% रक्कमेपैकी रु.४६७.७४ कोटी इतकी रक्कम महावितरण कंपनीस प्राप्त झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेला डीबीटी योजनेचा निर्णय मागे घेण्याबाबत

**(४७) * १२६७७२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळेतील बोगस विद्यार्थ्यांवरील कारवाईच्या न्यायालयीन निर्णयाची अंमलबजावणी करावी, एसआयटीमार्फत विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येणारी शिष्यवृत्ती त्वरीत थांबवावी, समांतर किंवा पदव्युत्तर तसेच व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळावी, वसतिगृहातच मेस पुन्हा सुरु करावी, वसतिगृहासाठी जात पडताळणी सक्तीची करावी अशा विविध मागण्यांसाठी राज्यातील सर्व शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी पुणे-नाशिक पायी संघर्ष मोर्चा माहे जुलै, २०१८ सुमारास काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा मोर्चा प्रामुख्याने “डीबीटी हटाव वसतिगृह बचाव” या घोषणा देत नाशिक येथील आदिवासी आयुक्त कार्यालयापर्यंत काढण्यात आला होता व उक्त प्रकरणी डीबीटी ही योजना प्रायोगिक तत्त्वावर असून ती ऐच्छिक आहे, तसेच ४९१ पैकी १२० वसतिगृहातच ही योजना लागू असेल मात्र डीबीटी हा शासन निर्णय असून तो रद्द करु शकत नाही, असे आदिवासी आयुक्त यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मासिक निर्वाह भत्ता, वार्षिक शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्यांसाठी व मेससाठीचा भत्ता या योजनांच्या लाभाची रक्कम वर्षानुवर्षे मिळत नसल्याने या निर्णयाविरोधात दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी नाशिक आदिवासी आयुक्त कार्यालयासमोर स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडियाच्यावतीने देखील आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांनी सदर मोर्चात केलेल्या मागण्यांबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) डीबीटी योजना रद्द करण्याबाबत नाशिक येथील विद्यार्थ्यांकडून मोर्चा काढण्यात आला होता हे खरे आहे.

मात्र, डीबीटी शासन निर्णय असून तो रद्द करु शकत नाही असे आयुक्त, आदिवासी विकास यांनी सांगीतले हे खरे नाही.

(३) व (४) स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडियाच्यावतीने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयासमोर केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने मा.मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडियासमवेत दि.३०.०८.२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत वसतिगृह DBT योजनेचा उद्देश त्यांना समजवून सांगण्यात आला. तसेच सदर योजनेबाबत विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची प्रतिक्रीया जाणुन घेण्यासाठी व्हीडीओ कॉन्फरन्सव्दारे प्रत्येक विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली आहे. बहूतांश विद्यार्थी सदर योजनेबाबत सकारात्मक असल्याचे सदर चर्चेत दिसून आले आहे.

विद्यार्थ्याचा वसतीगृह प्रवेश निश्चित झाल्यानंतर आहार खर्चाची तीन महिन्याची आगाऊ रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार सलग्न बँक खात्यावर २४ तासात जमा केली जात आहे. तसेच स्टेशनरीसाठी देय असलेली १००% रक्कम एक वेळेस देण्यात येते.

'अ', 'ब' व 'क' वर्ग महानगरपालिका, विभागीय शहरातील वसतीगृहे आणि जिल्हा स्तरावरील वसतीगृहांमध्ये प्रवेशित २००२१ विद्यार्थ्यांना जून ते नोव्हेंबर या महिन्यासाठीची आहाराकरिता देय असलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. सदर योजना सुरळीतपणे सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील खलाशाला उच्च दाबाच्या वीज वाहिनीचा धक्का लागल्याने मृत्यू झाल्याबाबत

**(४८) * १२७३०२ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील करंजा बंदराकडे जाणाऱ्या डंपरमधील श्री.परेश पालशेतकर या खलाशाला उच्च दाबाच्या वीज वाहिनीचा धक्का लागल्याने त्यांचा दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चिर्ले गावात विजेच्या तारेला स्पर्श होऊन एका वृध्द महिलेचाही मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरणमध्ये जागोजागी लोंबकळणा-या वीज वाहिन्या असून वीजेचे खांब जीर्ण झाले आहेत तरी शासनाने या अपघातांची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबधितांवर कारवाई करण्याबाबत, उरणमधील वीज वाहिन्या व खांब दुरुस्त करण्याबाबत व मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) उरण तालुक्यात जीर्ण झालेले पोल व तारा बदली करण्यासाठी पं. दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, आयपीडीएस योजना व आर अॅन्ड एम योजना या योजनेअंतर्गत कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला असून सदर देखभाल व दुरुस्तीची कामे प्रगती पथावर आहेत. सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, रायगड कार्यालयाकडून करण्यात आली आहे.

श्री.परेश पालशेतकर या मृत कामगाराच्या अपघातास संबंधित मालक श्री.रितेश निळकंठ नाखवा हे जबाबदार असल्याने संबंधित मृताच्या नातेवाईकास नुकसान भरपाई देण्याबाबत विद्युत निरीक्षकांनी कळविले आहे.

तसेच चिर्ले गावात वीजेच्या तारेला स्पर्श होऊन मृत पावलेल्या वृध्द महिलेच्या नातेवाईकास महावितरण कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई म्हणून तात्काळ मदत रु.२०,०००/- देण्यात आले आहेत व उर्वरित रु.३,८०,०००/- नुकसान भरपाई देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील अवैध सावकारांवर कारवाई करण्याबाबत

**(४९) * १२७९३२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील विभागीय सहनिबंधक, अमरावती यांच्याकडून सावकारग्रस्त शेतकऱ्यांची आलेली प्रकरणे कोणतीही चौकशी व कागदपत्रांची पडताळणी न करता फेरतपासणीसाठी जिल्हा उपनिबंधकाकडे पाठवून शेतकऱ्यांना नाहक त्रास देत असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय सहनिबंधकाकडून फेर निर्णयासाठी जिल्हा उपनिबंधकाकडे पाठवलेल्या सर्व अवैध सावकारी प्रकरणाची उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करण्याची मागणी सावकारग्रस्त शेतकरी समितीचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष श्री.विशाल बावस्कार यांनी मा.सहकार मंत्री यांचेकडे दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अमरावती विभागातील परवानाधारक सावकारांनी कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शासनाच्या कर्जमाफी योजनेपासून वंचित रहावे लागले असल्याने उक्त प्रकरणी सावकारी अधिनियमाचे उल्लंघन केल्यामुळे सुमारे १३४ सावकारांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून अद्यापि त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी विभागीय सहनिबंधकाकडुन फेर निर्णयासाठी जिल्हा उपनिबंधकाकडे पाठवलेल्या सर्व अवैध सावकारी प्रकरणाची उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करुन व कागदपत्रांची पडताळणी न करता फेरतपासणीसाठी जिल्हा उपनिबंधकाकडे पाठवून शेतकऱ्यांना नाहक त्रास देणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत व कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप करणाऱ्या सावकारांचे परवाने रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) होय.

(३) जनहित याचिका क्र. १११/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१.१.२०१८ रोजीच्या अंतरीम आदेशान्वये, कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप केलेल्या सावकारांच्या परवान्याचे नुतनीकरण करुन नये व अशा सर्व प्रकरणांत अधिनियमातील तरतूदीनुसार कारवाई करावी असे आदेशीत केले होते. त्यानुसार अमरावती विभागातील १६८ सावकारांवर कार्यक्षेत्राबाहेर कर्जवाटप केल्यामुळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) अवैध सावकारी व्यवहारांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीनुसार अमरावती विभागातील संबंधीत जिल्हा उपनिबंधकांनी दिलेल्या आदेशाविरुद्ध ऑक्टोबर, २०१८ अखेर १४० प्रकरणे विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. त्यापैकी ९२ प्रकरणांमध्ये विभागीय सहनिबंधकांनी अंतीम आदेश दिले आहेत. सदर ९२ प्रकरणांपैकी १३ प्रकरणांमध्ये विभागीय सहनिबंधकांनी संबंधीत जिल्हा उपनिबंधकांचे आदेश रद्द केले आहेत.

विभागीय सहनिबंधकांनी ४६ अपील प्रकरणामध्ये संबंधीत जिल्हा उपनिबंधकांचे आदेश कायम केले आहेत. सदर ४६ प्रकरणांपैकी ३५ प्रकरणांमध्ये अवैध सावकारी सिद्ध होत असून ११ प्रकरणांत अवैध सावकारी सिद्ध झालेली नाही.

उर्वरीत ३३ अपील प्रकरणांमध्ये कायदेशीर त्रुटी अढळून आल्याने सदर प्रकरणे विभागीय सहनिबंधकांनी फेरचौकशीसाठी संबंधीत जिल्हा उपनिबंधकांकडे परत पाठविली आहेत.

विभागीय सहनिबंधकांचे आदेश अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्याने सदर आदेशाविरुद्ध अधिनियमातील तरतूदीनुसार पुनरिक्षण अर्ज दाखल करता येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुळगाव (जि.यवतमाळ) येथील सावित्रीबाई फुले उच्च प्राथमिक अनुदानित आदिवासी निवासी आश्रमशाळेमध्ये विदयार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(५०) * १३२११२ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथील सावित्रीबाई फुले उच्च प्राथमिक अनुदानित आदिवासी निवासी आश्रमशाळेमध्ये विदयार्थ्यांना विविध गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांना झोपण्यासाठी गादया उपलब्ध नसणे, फाटक्या चादरींवर विद्यार्थी झोपत असून जेवणासाठी स्वतंत्र हॉल नाही, पिण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था नसून तेथे ग्रंथालय ही नाही तसेच कर्मचा-यांचीही राहण्याची तेथे व्यवस्था नाही तसेच नियमावलीप्रमाणे मुला-मुलींना जेवण व पोषण आहार मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने संबधित आश्रमशाळेची चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने आश्रमशाळेच्या प्रशासनातील संबधित दोषींवर कोणती कारवाई केली व विद्यार्थ्यांना सोयी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.

प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा, जि.यवतमाळ यांचे प्रस्तावानुसार अपर आयुक्त, अमरावती यांनी त्यांचे पत्र दिनांक ०५.११.२०१८ अन्वये मान्यता रद्द करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार आयुक्त स्तरावर संस्थेस कारणे दाखवा नोटीस देऊन सुनावणी घेऊन मान्यता रद्द करणेबाबत निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंगरखर्डा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील मजुराचा विजेच्या धक्याने मृत्य झाल्याबाबत

**(५१) * १३२१२० डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरखर्डा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील श्री.शंकर रामराव वरफडे यांचा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भिंतीला असलेल्या अर्थिंग तारेला स्पर्श झाल्याने दिनांक ५ जूलै, २०१८ रोजी मृत्यु झाला असून संबधित विभागाने त्यांच्या कुटूंबियांना मदत केली नसल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबधित विभागाच्या अधिका-यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषीवर कारवाई करण्याबाबत व संबधित मृत व्यक्तीच्या कुंटुबाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, यवतमाळ या कार्यालयामार्फत दिनांक ०९.०७.२०१८ रोजी करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, डोंगरखर्डा, ता.कळंब, जि.यवतमाळ हे महावितरण कंपनीचे मध्यमदाब ग्राहक आहेत. ग्राहकाच्या विद्युत संचमांडणीत फ्युजतारेऐवजी तांब्याच्या जाड तारा टाकण्यात आल्या होत्या. तसेच ग्राहकाच्या संचमांडणीतून सदर दवाखान्याच्या आवारातील पथदिव्यास वीजपुरवठा करण्यासाठी जोडलेली केबल जमिनीवर टाकण्यांत आलेली होती. सदर केबलच्या फेजचे इन्सुलेशन निघून विद्युतभारीत भाग जमिनीला स्पर्श करीत होता. दिनांक ०५.०७.२०१८ रोजी पडलेल्या पावसामुळे सदर उघडया केबलच्या आजूबाजूचा परिसर ओला झालेला होता. सदर ओलसर भाग सदर केबलमधील विद्युतक्षरणामुळे विद्युतभारीत झालेला होता. दिनांक ०५.०७.२०१८ रोजी श्री.शंकर रामराव वरफडे मौजे डोंगरखर्डा, ता.कळंब, जि.यवतमाळ हे सदर विद्युत भारीत जागेवरुन जात असताना त्यांना विद्युत धक्का बसून प्राणांतिक अपघात घडला.

सदर अपघातास वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, डोंगरखर्डा जबाबदार असल्याने मृतकाच्या नातेवाईकास भरपाई देण्याबाबत विद्युत निरीक्षक, यवतमाळ यांनी संबंधितांस कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.